
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २९५
www.ramprahar.com
◆ गुरुवार, १४ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
अलिबाग मच्छीमार जेट्टीवर पोलिसांचे मॉकड्रिल/२
भरडखोल आधुनिक मत्स्यबंदराचा शुभारंभ/५
पॉवर प्लेमध्ये विदर्भकर प्रफुल हिंगेची हवा/८

## नाशिक कुंभमेळ्याचा महाप्लॅन तयार; बोधचिन्हाचे अनावरण



**मुंबई** : नाशिकमध्ये होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या नियोजनासाठी बुधवारी (दि. १३) महत्त्वाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीत १३ आखाड्यांच्या साधू-महंतांशी संवाद साधून तयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीत कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले असून त्र्यंबकेश्वर दर्शन पथ प्रकल्पाचे ऑनलाइन भूमिपूजनही करण्यात आले. कुंभमेळ्यासाठी प्रशासन सज्ज असून केवळ चालू वर्षाचा विचार न करता भविष्यातील गरजा लक्षात घेऊन कायमस्वरूपी सोयीसुविधा निर्माण करण्यावर भर दिला जात असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. कुंभमेळ्यासाठी ३७७ एकर जमीन आरक्षित करण्यात आली आहे.





**उलवे नोड : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त त्यांचे अभीष्टचिंतन आणि रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या इमारतीचे उद्घाटन बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. या सोहळ्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्याचे मंत्री गणेश नाईक, आशिष शेलार, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, शकुंतला ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते. तत्पूर्वी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी मान्यवरांनी भेट दिली. या वेळी रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार, त्यांच्या सुविद्य पत्नी प्रतिभा पवार यांनीही उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. सोबत खासदार सुनील तटकरे, खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, 'दिबां'चे पुत्र अतुल पाटील आदी मान्यवर. (वृत्त उद्याच्या अंकात)**

## 'नीट' पेपरफुटीचे धागेदोरे पुण्यापर्यंत
### ब्युटी पार्लर चालवणारी संशयित महिला ताब्यात

**पुणे : प्रतिनिधी**

देशभर गाजत असलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे आता विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यापर्यंत येऊन पोहचले आहेत. लातूर व अहिल्यानगरनंतर आता पुण्यातही या रॅकेटचे कनेक्शन उघड झाल्याने खळबळ उडाली आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने बुधवारी (दि. १३) पहाटे बिबवेवाडी परिसरात गोपनीय कारवाई केली. यात एका महिलेला पोलिसांनी ताब्यात घेतले असून तिच्या अटकेमुळे या घोटाळ्याचे नेटवर्क किती खोलवर पसरले याचा धक्कादायक खुलासा होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. ही महिला बिबवेवाडी परिसरात ब्युटी पार्लर चालवत असल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणाची पाळेमुळे शोधताना पोलिसांना अहिल्यानगरमध्ये अटक करण्यात आलेल्या धनंजय लोखंडेच्या चौकशीतून अनेक धागेदोरे मिळाले होते. लोखंडेच्या चौकशीदरम्यान या महिलेचे नाव समोर आले. ही महिला विद्यार्थ्यांना हेरून त्यांना धनंजय लोखंडे नावाच्या मध्यस्थापर्यंत पोहचवण्याचे काम करीत होती का? याचा तपास आता गुन्हे शाखा करीत आहे. यावेळी पोलिसांनी तिचा मोबाइल व लॅपटॉप जप्त केला. प्राथमिक माहितीनुसार धनंजय लोखंडे व महिला यांच्यामध्ये अनेक वेळा व्हॉट्सअ‍ॅप कॉल्स, संशयास्पद मेसेजेसची देवाणघेवाण झाली आहे. या इलेक्ट्रॉनिक पुराव्यांमध्ये काही महत्त्वाच्या विद्यार्थ्यांची नावे आणि आर्थिक व्यवहारांचे आकडे दडलेले असू शकतात, असा संशय तपास यंत्रणांना आहे.

### अहिल्यानगरचा डॉक्टर गजाआड

**अहिल्यानगर :** देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने मोठी कारवाई करत अहिल्यानगरमधून डॉ. धनंजय निवृत्ती लोखंडे याला सिनेस्टाईल पद्धतीने अटक केली. बुधवारी सकाळी डीएसपी चौक परिसरातून सीबीआयच्या मुंबई विभागाच्या पथकाने त्याला ताब्यात घेतल्याने शहरात मोठी खळबळ उडाली. वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या नीट परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणाचा तपास आता अधिक वेगाने सुरू असून नवी दिल्ली येथे दाखल गंभीर गुन्ह्यात डॉ. लोखंडे याला हस्तांतरित करण्यात येणार आहे.

## पंतप्रधानांच्या आवाहनाला मुख्यमंत्र्यांकडून प्रतिसाद
### मंत्र्यांच्या ताफ्यातील गाड्या निम्म्यावर; परदेश दौरे रद्द, सार्वजनिक वाहतुकीचा वापर बंधनकारक

**मुंबई : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन बचत आणि परकीय चलन वाचवण्याचे आवाहन केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी बुधवारी (दि. १३) महत्त्वाचे निर्णय जाहीर केले आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी दोन उच्चस्तरीय बैठकांत विविध उपाययोजनांचा आढावा घेतला. या बैठकांना मुख्य सचिव, पोलीस महासंचालक आणि अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत इंधन बचत, ऊर्जा संवर्धन आणि शासकीय खर्चात काटकसर करण्यासाठी विविध उपाययोजना निश्चित करण्यात आल्या.



या निर्णयांनुसार मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या तत्काळ प्रभावाने अर्ध्यावर आणण्यात येणार आहे. तसेच मंत्री आणि अधिकाऱ्यांचे परदेश दौरे रद्द करण्यात आले असून सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्र्यांसह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या अर्ध्यावर आणण्याचे आदेश देण्यात आले आहेत. बाहेरच्या दौऱ्यांदरम्यान निर्धारित संख्येपेक्षा अधिक वाहने ताफ्यात नसतील याची जबाबदारी संबंधित पोलीस आयुक्त किंवा पोलीस अधीक्षकांवर सोपवण्यात आली आहे.

मंत्री, वरिष्ठ अधिकाऱ्यांना परदेश दौरे न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अभ्यास दौरे व शासकीय कामांसाठी होणारे अनावश्यक प्रवासही रद्द करण्यास सांगण्यात आले आहे. मंत्री व अधिकाऱ्यांनी मेट्रोसह सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वापर करावा. किमान एक दिवस सार्वजनिक वाहतुकीचा वापर करून हा प्रयोग राबवण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

### पंतप्रधानांनी केली स्वत:पासून सुरुवात

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदींनी इंधन बचत व परकीय चलन वाचवण्यासाठी नागरिकांना पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करण्याचे आवाहन केले आहे. स्वत: पंतप्रधान मोदी बुधवारी आपल्या १६ ते २० गाड्यांच्या ताफ्याऐवजी अवघ्या दोन गाड्यांच्या ताफ्यात दिसले. मुख्यमंत्री फडणवीसांच्या ताफ्यातही निम्म्याने कपात झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांच्या ताफ्यातही निम्म्याने कपात झाली, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी इलेक्ट्रिक कारचा वापर करीत ताफ्यातील गाड्याही निम्म्या केल्या आहेत.

## सीबीएसई बारावीचा निकाल जाहीर
### मुलींची पुन्हा बाजी



**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने सीबीएसई १२ वीचा निकाल बुधवारी (दि. १३) जाहीर केला असून देशाचा एकूण निकाल ८५.२ टक्के लागला आहे. यंदाही मुलींनी मुलांवर मात करीत सरस कामगिरी केली आहे. तिरुवनंतपूरम विभाग ९५.६२% निकालासह देशात प्रथम क्रमांकावर आहे, तर पुणे विभागाचा निकाल ८७.३२% लागला आहे. बोर्डाने यंदा 'ऑन-स्क्रीन मार्किंग' प्रणालीचा यशस्वी वापर केला असून कोणतीही अधिकृत गुणवत्ता यादी प्रसिद्ध केलेली नाही. विद्यार्थी अधिकृत संकेतस्थळ 'डिजी लॉकर' आणि 'उमंग' अ‍ॅपवर आपला निकाल पाहू शकतात. पुरवणी परीक्षा १५ जुलै रोजी होणार आहे.

यावर्षी १२ वीच्या परीक्षेसाठी १८ लाख ५७ हजार ५१७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यापैकी १५ लाख ७ हजार १०९ विद्यार्थी यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या निकालात तिरुवनंतपूरम विभागाने ९५.६२ टक्के निकालासह देशात अव्वल स्थान पटकावले असून त्यापाठोपाठ चेन्नई (९३.८४%) आणि बेंगळुरू (९३.१९%) विभागांचा क्रमांक लागतो.

दरम्यान, नुकत्याच लागलेल्या इयत्ता दहावीच्या निकालातही मुलींचाच दबदबा दिसून आला. आता त्याचीच पुनरावृत्ती दिसून येत आहे. सीबीएसई बारावीच्या परीक्षेत यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांवर त्यांच्या नातेवाईक आणि मित्रपरिवारांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## पोहण्यासाठी गेलेल्या तीन शाळकरी मुलींचा बुडून मृत्यू

**सिंधुदुर्ग : प्रतिनिधी**

राज्यात गेल्या काही दिवसांत वेगवेगळ्या जिल्ह्यात पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. एकीकडे उन्हाळ्यापासून थोडासा दिलासा मिळवण्यासाठी तरुणाई पोहण्याचा आनंद घेत, विहिर, तलाव आणि जलाशयाकडे धाव घेतात, मात्र काहीवेळा पोहण्याचा हा आनंद जीवावर बेतल्याचेही दुःखद प्रसंग घडले आहेत. आता सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या वैभववाडीतील करुळ धरणात तीन शाळकरी मुलींचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बुधवारी (दि. १३) घडली असून सुदैवाने दोघेजण बचावल्याची माहिती आहे.

करूळ येथील धरणावर अंघोळीसाठी म्हणून एकूण पाच जण गेले होते. त्यातील तिघींचा पाण्यात बुडून मृत्यू झाला, तर दोघांना वाचवण्यात यश आले. तन्वी अनंत माळकर (१६ वर्ष), स्वरा संदीप सुर्वे (११ वर्ष) आणि ऋतिका संतोष पाटील (१४ वर्ष) अशी मृत्यू झालेल्या मुलींची नावे आहेत. यापैकी दोघी मुली करूळ भोयडेवाडी येथील होत्या, तर एक मुलगी कुसूर येथील होती. त्या आपल्या मामाच्या गावी आल्या असताना काळाने त्यांच्यावर झडप घातली.

## आता हरियाणातही भाजपचा दबदबा!
### स्थानिक निवडणुकांमध्ये वर्चस्व; पंतप्रधानांनी मानले आभार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भाजपने पश्चिम बंगाल, आसाम विधानसभा निवडणुकीतील विजयाची लय हरियाणा येथील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही कायम ठेवली आहे. भाजपने अंबाला आणि सोनीपत यांसह इतरही नगरपालिका, महानगरपालिका निवडणुकीत चांगले यश मिळवले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाजपच्या विजयाबद्दल जनतेचे आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांचे आभार मानले आहेत.




अंबाला महानगरपालिका महापौर निवडणुकीत भाजपच्या उमेदवार अक्षिता सैनी यांनी काँग्रेसच्या कुलविंदर कौर यांचा २१,३५८ मतांनी पराभव केला. अपक्ष उमेदवार सोनिया राणी तिसऱ्या क्रमांकावर राहिल्या. सोनीपतमध्ये भाजपचे राजीव जैन यांनी काँग्रेसचे उमेदवार कमल देवान यांचा २३,२४७ मतांच्या मोठ्या फरकाने पराभव केला. आयएनएलडीचे आनंद कुमार तिसऱ्या क्रमांकावर राहिले.

पंचकुला महानगरपालिकेत भाजपचे श्यामलाल बन्सल यांनी काँग्रेसच्या सुधा भारद्वाज यांच्या विरोधात अभेद्य आघाडी घेतली आहे. आम आदमी पक्षाचे राजेश कुमार तिसऱ्या स्थानावर आहेत. सध्या अंबाला, पंचकुला आणि सोनीपत या तिन्ही महानगरपालिकांचे महापौरपद भाजपच्या ताब्यात आहे. रेवाडी नगर परिषदेत भाजपच्या विनिता पिप्पल यांनी काँग्रेसच्या नेहरिका यांचा २१,४४५ मतांनी पराभव केला. धारुहेरा नगरपालिकेत भाजपचे सत्यनारायण उर्फ अजय जांगरा यांनी अपक्ष उमेदवार बाबूलाल यांचा ६,२३६ मतांनी पराभव केला. सांपला नगरपालिकेत भाजपचे प्रवीण यांनी अपक्ष उमेदवार अंकित यांचा ६८७ मतांनी पराभव केला आहे.

दरम्यान, वॉर्ड निवडणुकीतही भाजपने लक्षणीय यश मिळवले. अंबाला नगर परिषदेच्या २० वॉर्डांपैकी भाजपने १६ जागा जिंकल्या, तर काँग्रेसने तीन आणि एक जागा अपक्ष उमेदवाराला मिळाली. सोनीपतमध्ये भाजपने १७ वॉर्ड जिंकले, तर काँग्रेसने पाच वॉर्ड जिंकले.

हरियाणामधील विजयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेचे आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांचे आभार मानले आहेत.



# 'मनमानी भाडेवाढ करणाऱ्या खासगी बस वाहतूकदार आणि अवैध प्रवासी ॲप्सवर कारवाई करा'

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील खासगी प्रवासी बस वाहतूकदारांकडून केली जाणारी बेकायदेशीर दरवाढ आणि अनधिकृत मोबाईल ॲप्सद्वारे प्रवाशांची होणारी आर्थिक पिळवणूक याबाबत शासन गंभीर असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले. या संदर्भातील तक्रारींचे निराकरण करण्यासाठी तसेच दीर्घकालीन उपाययोजना सुचविण्यासाठी सह परिवहन आयुक्त आणि सुराज्य अभियानातील तीन प्रतिनिधींचा समावेश असलेली विशेष समिती गठित करण्याचे महत्त्वपूर्ण निर्देश त्यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले.

या बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर तसेच सुराज्य अभियान संघटनेचे अभिषेक मुरुकटे, अरविंद पानसरे, सुनील हनवट आदी उपस्थित होते. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, गठित समिती खासगी बसच्या भाडेवाढीवर नियंत्रण मिळवणे, अवैध बुकिंग ॲप्सना आळा घालणे आणि प्रवाशांच्या तक्रारींवर प्रभावी उपाययोजना सुचविणे याबाबत सविस्तर अहवाल सादर करेल.



समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील बैठकीचे आयोजन करण्यात येईल. समितीने सुचविलेल्या उपाययोजनांची राज्य सरकारकडून प्रभावी आणि तातडीने अंमलबजावणी केली जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

सध्या अनेक खासगी ट्रॅव्हल्स कंपन्या अनधिकृत ॲप्सच्या माध्यमातून प्रवाशांचे बुकिंग करत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत असल्याचे सांगून मंत्री सरनाईक म्हणाले की, सण-उत्सव किंवा सुट्ट्यांच्या काळात प्रवाशांकडून अव्वाच्या सव्वा तिकीट दर आकारले जातात. प्रवाशांची आर्थिक लूट करणाऱ्या अशा प्रवासी बस वाहतूकदारांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत प्रवाशांची लूट खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

राज्यातील बसस्थानकांवरील संपर्क यंत्रणा अधिक सक्षम आणि प्रभावी करणे आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी प्रत्येक बसस्थानकावर प्रवासी सुविधांसाठी संपर्क क्रमांक उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या. तसेच, परिवहन विभागाने नावे बदललेल्या गावांबाबत आणि व्याकरणदृष्ट्या अचूक मराठी भाषेचा वापर करण्याबाबत परिपत्रक जारी करावे व त्याची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करावी, असेही त्यांनी निर्देश दिले.

राज्यातील एसटी बस आणि बसस्थानकांच्या अस्वच्छतेबाबत प्रवाशांकडून वारंवार तक्रारी प्राप्त होत असल्याचे नमूद करून मंत्री सरनाईक म्हणाले की, बसस्थानकांचा कायापालट करण्यासाठी आणि कायमस्वरूपी स्वच्छता राखण्यासाठी ठोस पावले उचलण्यात येत आहेत.

१ जूनपासून महामंडळाच्या सर्व बसस्थानकांवरील स्वच्छतागृहे मोफत करण्यात येणार असून, प्रवाशांना उत्तम दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

## रायगडातील वासांबे ग्रामपंचायतीला राष्ट्रीय आत्मनिर्भर पंचायत विशेष पुरस्कार जाहीर

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारत सरकारच्या पंचायतराज मंत्रालयामार्फत २०२४-२५ या वर्षीचा आत्मनिर्भर पंचायत विशेष पुरस्कार हा रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील वासांबे ग्रामपंचायतीला जाहीर झाला आहे. यामुळे रायगड जिल्ह्याचा डंका राष्ट्रीय स्तरावरही कायम असल्याचे सिद्ध झाले आहे.पंचायतराज मंत्रालयामार्फत स्वतःचे महसुलाचे स्त्रोत वाढवून त्यातून गावाचा शाश्वत विकास साधाणा-या ग्रामपंचायतींना हा विशेष श्रेणीतील 'आत्मनिर्भर पंचायत' पुरस्कार दिला जातो.



खालापूर तालुक्यातील वासांबे ग्रामपंचायतीने आपले उत्पन्न वाढविण्यासाठी मनोरंजन कर, व्यवसाय कर, आठवडा बाजार कर अशाप्रकारचे कर त्याचप्रमाणे करेत्तर स्त्रोतांच्या माध्यमातून आपला महसूल वाढविला. या महसुलाचा विनियोग गावातील विविध विकासकामांसाठी करण्यात आला. यासाठी सरपंच उमा मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी, ग्रामस्थ यांनी कसोशीने प्रयत्न केले.

यामुळेच रायगड जिल्हा परिषद व महाराष्ट्र शासनाच्या वतीने वासांबे ग्रामपंचायतीचे नामनिर्देशन 'आत्मनिर्भर पंचायत' या पुरस्कारासाठी केंद्रीय पंचायतराज विभागाकडे पाठविण्यात आले. त्यानंतर पुरस्कार निवडीसाठी केंद्रीय सरकारच्या समितीने वासांबे ग्रामपंचायतीला भेट देउन पाहणी केली व समाधान व्यक्त केले. विविध मूल्यांकनाच्या आधारे २०२४-२५ या वर्षीचा आत्मनिर्भर पंचायत विशेष पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

या पुरस्काराबद्दल रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व उपमुख्य कार्यक्रारी अधिकारी ग्रामपंचायत विशाल तनपुरे यांनी वासांबे ग्रामपंचायत प्रशासन तसेच खालापूरचे गटविकास अधिकारी संदीप कराड यांचे अभिनंदन केले आहे.

**राष्ट्रीय स्तरावर आपल्या जिल्ह्यातील ग्रामपंचायत पुरस्कार मिळविते ही अतिशय अभिमानास्पद बाब आहे. आपल्या गावाचा विकास साधणे हे आपल्या सर्वांच्या हातात आहे. त्याचप्रमाणे रायगड जिल्हा परिषदेचे सहाकार्य कायमच यासाठी असणार आहे. ग्रामपंचायतीचे अभिनंदन.**

**-मंगेश वाकडीकर, अध्यक्ष, राजिप**

# महाड नगर परिषद सर्वसाधारण सभा वृक्ष लागवड, पाणीप्रश्न,पारदर्शकतेच्या मुद्द्यावर गाजली

**महाड : प्रतिनिधी**

महाड नगरपालिकेची सोमवारी पार पडलेली सर्वसाधारण सभा विविध प्रश्नांमुळे चांगलीच गाजली. विकासकामांसाठी झालेला खर्च, चवदार तळे सत्याग्रह दिनानिमित्त करण्यात आलेली भोजन व्यवस्था, 'माझी वसुंधरा' अभियानातील वृक्षलागवड तसेच शहरातील गंभीर पाणीप्रश्न या मुद्यांवरून सभागृहात सत्ताधारी आणि विरोधी सदस्य आमनेसामने आल्याचे चित्र पाहायला मिळाले. अनेक विषयांवर प्रशासनाला थेट उत्तर द्यावे लागले, तर काही मुद्द्यांवर सदस्यांनी तीव्र नाराजी नोंदवली.



नगराध्यक्ष सुनील कविस्कर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत एकूण ५८ विषय मांडण्यात आले. यामध्ये तातडीच्या स्वरूपात करण्यात आलेल्या कामांना नंतर आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यासंबंधीचा प्रस्ताव चर्चेचा मुख्य विषय ठरला. उपनगराध्यक्ष संदीप जाधव यांनी या प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित करत, नियमांचा वापर अपवादात्मक परिस्थितीतच व्हायला हवा, असे स्पष्ट मत मांडले. नियोजनाअभावी वारंवार कार्योत्तर मंजुरी घेणे योग्य नसल्याची टीका त्यांनी केली.

चवदार तळे सत्याग्रह दिन कार्यक्रमासाठी पालिकेमार्फत करण्यात आलेल्या भोजन व्यवस्थेवरूनही सभागृहात जोरदार चर्चा रंगली. कार्यक्रमादरम्यान अनेक सामाजिक संस्था व संघटनांनी स्वतंत्र अन्नछत्रे चालवली होती. त्यामुळे पालिकेने दाखविलेला भोजन खर्च वास्तवाशी जुळत नसल्याचा आरोप विरोधी सदस्यांनी केला. कार्यक्रमाच्या नियोजनात नगरसेवकांना सहभागी करून घेतले गेले नसल्याबद्दलही नाराजी व्यक्त करण्यात आली.

नगरसेवक वजीर कोंडीवकर आणि हेमंत चांदलेकर यांनी या खर्चाची स्वतंत्र चौकशी व्हावी, अशी मागणी करत सार्वजनिक निधीच्या वापरात पारदर्शकता राखणे आवश्यक असल्याचे सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीशी निगडित कार्यक्रमांमध्ये कोणत्याही प्रकारचा संशय निर्माण होणार नाही, याची काळजी प्रशासनाने घ्यावी, असे मतही त्यांनी मांडले.

सभेत 'माझी वसुंधरा अभियान-३' अंतर्गत करण्यात आलेल्या वृक्षलागवडीच्या कामांवरूनही प्रशासनाला धारेवर धरण्यात आले. अनेक भागांत लावलेली झाडे सुकल्याचे निदर्शनास आणून देत, वृक्षसंवर्धनाकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप सदस्यांनी केला. काही ठिकाणी प्रत्यक्ष झाडे नसतानाही काम पूर्ण दाखवून निधी खर्च झाल्याचा गंभीर मुद्दा उपस्थित करण्यात आला. जिओ-टॅगिंग आणि देखभालीची प्रभावी यंत्रणा राबवण्यात अपयश आल्याची टीकाही करण्यात आली.सर्व मुद्यांवर उत्तर देताना नगराध्यक्ष सुनील कविस्कर यांनी प्राप्त तक्रारी गांभीर्याने घेतल्या जातील, असे सांगितले. संबंधित कामांची चौकशी करून दोषी आढळल्यास आवश्यक कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

शहरातील वाढत्या पाणीटंचाईमुळे पाणीपुरवठा व्यवस्थेवरही सविस्तर चर्चा झाली. पाणीलाईनवर मोटारी बसवून अतिरिक्त पाणी खेचणाऱ्यांविरोधात कारवाईचा निर्णय सभेत घेण्यात आला.

## जनगणना २०२७ अंतर्गत स्वगणना सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

भारताची जनगणना-२०२७ ही प्रथमच डिजिटल पद्धतीने करण्यात येणार असून नागरिकांसाठी स्व-गणना (Self Enumeration) सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी, रायगड-अलिबाग यांनी केले आहे.

भारत सरकारच्या जनगणना संचालनालयामार्फत जनगणना-२०२७ अंतर्गत घरगुती व घरगणना टप्प्याचे क्षेत्रीय कार्य दि. १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत पार पडणार आहे. यंदाची जनगणना ही पूर्णतः डिजिटल स्वरूपात होत असून नागरिकांना https://se.census.gov.in या संकेतस्थळावर जाऊन स्व-गणना करता येणार आहे.

स्व-गणना प्रक्रियेबाबत नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती होणे आवश्यक असल्याने सर्व शासकीय कार्यालये तसेच अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांनी या मोहिमेचा प्रसार करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नागरिकांना स्व-गणनेबाबत मार्गदर्शन करावे तसेच कार्यालयीन संकेतस्थळ, सोशल मीडिया, व्हॉट्सॲप समूह आदी माध्यमांतून जनजागृती करावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

जनगणना हे राष्ट्राच्या विकास नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाचे राष्ट्रीय कार्य असून विविध शासकीय योजनांच्या आखणीसाठी जनगणनेतील आकडेवारीचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो.

## ग्लँडर्सचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी वाहतुकीच्या घोड्यांची तपासणी



**अलिबाग : प्रतिनिधी**

ग्लँडर्सचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रवासी वाहतूक करणाऱ्या रायगड जिल्ह्यातील घोड्यांची आरोग्य तपासणी सुरु करण्यात आली आहे. अलिबाग, मुरुडसह माथेरानमधील एक हजारांहून अधिक घोड्यांची आरोग्य तपासणी केली जाणार आहे.

बुधवारी (दि.१३) सकाळी अलिबाग समुद्रकिनाऱ्यावर घोड्यांच्या आरोग्य तपासणीचे शिबीर आयोजन करण्यात आले होते. या शिबीराच्या उद्घाटन समारंभास जिल्हा परिषदेचे पशुसंवर्धन सभापती वैकुंठ पाटील, अलिबागच्या उपनगराध्यक्ष ॲड. मानसी म्हात्रे, बांधकाम सभापती प्रशांत नाईक, रायगडचे सहाय्यक पशुसंवर्धन आयुक्त डॉ. सचिन देशपांडे यांच्यासह पशुवैद्यकीय अधिकारी, अश्वपालक, घोडागाडी चालक उपस्थित होते.

ग्लँडर्स हा अत्यंत संसर्गजन्य आणि गंभीर आजार आहे. जो घोडे, खेचर आणि गाढवांना होतो. प्राण्यांकडून तो मानवांमध्येही प्रसारीत होऊ शकतो. त्यामुळे या आजाराला झुनोटीक असे संबोधले जाते. बर्कहोल्डरीया मॅलेई या जीवाणूमुळे हा आजार होतो. दुषित चारा, पाणी अथवा बाधित प्राण्यांच्या संपर्कात आल्याने हा आजार होऊ शकतो, प्राण्यांच्या नाकातील स्त्राव अथवा जखम याच्या संपर्कात आल्यास मानवालाही या आजाराची लागण होऊ शकते. त्यामुळे प्रवासी वाहतूक करणाऱ्या घोड्यांची तपासणी करण्याचा निर्णय रायगडच्या पशुसंवर्धन विभागाने घेतला आहे.

याअंतर्गत अलिबाग, मुरुड आणि माथेरान येथे शिबीरे आयोजित करून घोड्यांची रक्त तपासणी केली जाणार आहे. हे रक्त नमुने हरियाणा हिसार राष्ट्रीय प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात येणार आहेत. घोड्यांची तपासणी करून अहवाल प्राप्त झाल्यावर प्रत्येक घोड्यासाठी आरोग्य कार्ड वितरित केले जाणार आहे.

## उष्णतेच्या लाटेमुळे शासनाच्या विविध विभागांना सतर्कतेच्या सूचना

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर उष्णतेच्या लाटेमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन राज्य शासनाच्या महसूल व वन विभागांतर्गत आपत्ती व्यवस्थापन विभागाने सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांना मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

उष्णतेच्या लाटेचा परिणाम कमी करण्यासाठी महानगरपालिका, नगरपालिका, आरोग्य, पंचायत, शिक्षण, कामगार, परिवहन, कृषी, पोलीस, सार्वजनिक बांधकाम, ऊर्जा, महिला व बालविकास, MIDC तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण या विभागांना आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सार्वजनिक ठिकाणी सावली, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, ORS सुविधा, शीतपेय केंद्रे, प्रथमोपचार किट, तसेच जनजागृती फलक लावण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

आरोग्य विभागामार्फत उष्माघातग्रस्त रुग्णांसाठी स्वतंत्र वैद्यकीय सुविधा, जलद प्रतिसाद पथके (RRT), PHC स्तरावर ORS व आवश्यक औषधसाठा उपलब्ध ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शाळा-महाविद्यालयांमध्ये दुपारच्या वेळेत मैदानी उपक्रम टाळणे, विद्यार्थ्यांना पुरेसे पाणी व सावलीची सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच उष्णतेबाबत जनजागृती करण्यावर भर देण्यात आला आहे.

महिला व बालविकास विभागामार्फत अंगणवाडी सेविका व आशा कार्यकर्त्यांद्वारे जनजागृती मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## अलिबाग मच्छीमार जेट्टीवर पोलिसांचे मॉकड्रिल

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग मच्छीमार जेट्टीवर संशयास्पद बोट आल्याचा फोन अलिबाग पोलीसठाण्याला आला. त्यामुळे` पोलिसांचा ताफा तेथे पोहचला. अचानक पोलीस आले आणि त्यांनी बोटींची तपासणी सुरू केली. त्यामुळे अलिबाग कोळीवाडा पारिसारात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परंतु तसे काही घडले नव्हते , असा प्रकार भविष्यात घडल्यास पोलीसांची किती तयारी आहे यासाठी पोलिसांनी केलेले हे मॉकड्रिल असल्याचे पोलीसांनी सांगितले. त्यामुळे नागरीकांनी सुटकेचा निःश्वास टाकला.



बुधवारी (दि. १३) दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास अलिबाग मच्छीमार जेट्टीवर आचानक पोलीसांचा ताफा आला. त्यांनी जेट्टीला वेढा घातला. अलिबाग जेट्टीवर संशयास्पद बोट आली आहे . त्यात आतंकवादी विस्फोटक घेऊन आले असल्याची माहिती मिळाल्यामुळे आम्ही येथे आला आहोत असे सांगून पोलीसांनी बोटींची तपासणी सुरू केली. परंतु कोणतीली संशायीत बोट आलेली नव्हती. भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडल्यास कशा प्रकारे प्रतिसाद देता येईल व सुरक्षेच्या दृष्टिकोनातून काय उपाययोजना करता येतील याचे मॉकड्रिल करण्यात आले होते.

परीविक्षाधीन उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती योगिता कुटे यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक किशोर साळे यांच्यासह २० पोलीस, दहशतवाद विरोधी शाखेचे पोलीस निरीक्षक राजेंद्र जाधव व त्यांचे शाखेतील २ अंमलदार . शिघ्र प्रतिसाद दलाचे २० जवान, बॉम्बशोधक, श्वान पथक सहभागी झाले होते.

## गोरेगाव येथे श्री श्री रविशंकर यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

**माणगाव : बातमीदार**

गोरेगाव येथे आज "रवी दर्शन" या नवीन सभागृहात परमपूज्य श्री श्री रविशंकर यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त तसेच The Art of Living Foundation च्या ४५ व्या वर्धापनदिनानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या समाजोपयोगी उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या रक्तदान शिबिरात ३० हून अधिक रक्तदात्यांनी सहभाग नोंदवून सामाजिक बांधिलकी जपली. विशेष म्हणजे महिला रक्तदात्यांनीही मोठ्या उत्साहाने रक्तदान करून समाजाप्रती आपली जबाबदारी अधोरेखित केली. संपूर्ण शिबिरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

कार्यक्रमादरम्यान गोरेगाव परिसरातील अनेक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते तसेच राजकीय क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींनी उपस्थित राहून उपक्रमाचे कौतुक केले. आयोजकांनी केलेल्या नियोजनाचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात आले.गोरेगाव आर्ट ऑफ लिव्हिंग परिवाराच्या वतीने रक्तदाते तसेच सहकार्य करणाऱ्या सर्व नागरिकांचे आभार मानण्यात आले.



**मुरूड : अलिबाग-मुरूड मतदारसंघाचे आमदार महेंद्र दळवी यांना शिवसेनेच्या विधानसभा संघटक तनुजा मोरे-घरत व पदाधिकाऱ्यांनी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.**

# अभिनयासाठी अचूक निरीक्षण महत्त्वाचे -दिग्दर्शक अभिजीत झुंझारराव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अभिनय करताना अचूक निरीक्षण महत्त्वाचे व गरजेचे असते. किमान कृती, कमाल प्रभाव या सूत्राचा वापर अभिनेत्याने करायला हवा. तालीमकरताना चार भिंतीत चुका केल्या तर चालतील पण रंगमंचावर चुक चालणार नाही असे मराठी चित्रपट, वेबसिरीज, मालिकांचे दिग्दर्शक, अभिनेता अभिजीत झुंझारराव यांनी सांगितले.




पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नऊ दिवसांच्या अभिनय प्रशिक्षण शिबिरांतर्गत आज दिनांक १३ मे रोजी शिबिरार्थींना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. पुढे ते म्हणाले, अभिनेत्याच्या अंगी सभाधीटपणा, उत्तम निरीक्षण, समयसूचकता हे गुण असणे गरजेचे आहे. यावेळी त्यांनी नट आणि दिग्दर्शकाचे नाते विविध प्रसंगाच्या सादरीकरणातून दाखवले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर यांनी केले. यावेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे कार्यवाह शामनाथ पुंडे, कविता ठाकूर, तसेच मनपाचे जनसंपर्क अधिकारी नितीन साके उपस्थित होते. मोठ्या संख्येने शिबिरार्थी उपस्थित होते.

या नाट्यशिबिरासाठी प्रशिक्षक म्हणून अशोक केंद्रे, संकेत खेडकर, विद्यानाथ सुर्वे, मनोज चिताडे, विक्रांत धीवरे यांचे मार्गदर्शन होत आहे. खारघर कळंबोली व पनवेल येथे सीनियर व ज्युनिअर अशा गटांमध्ये हे शिबिर सुरु आहे. या अभिनय शिबिरामध्ये नाट्य, सिने क्षेत्रातील मान्यवरांकडून शिबीरात मार्गदर्शन केले जात आहे.

या उपक्रमांतर्गत आज दिग्दर्शक, अभिनेता अभिजीत झुंझारराव यांचे शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. या पुढील काळात डॉ. विजय देशमुख, ज्येष्ठ दिग्दर्शक अभिनेते प्रमोद पवार, ज्येष्ठ अभिनेते अनिल सुतार यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

## माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सामाजिक उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या उत्सवाचाच एक भाग म्हणून मंगळवारी शिवाजीनगर गावातील २५० महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले.



या कार्यक्रमाला लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उपस्थित राहून महिलांशी संवाद साधून त्यांना साड्यांचे वाटप केले. यावेळी भाजपचे शिवाजीनगरचे अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर, उपाध्यक्ष व्ही.के.ठाकूर, पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, अर्चना ठाकूर, पनवेल महापालिकेच्या नगरसेविका दर्शना भोईर, प्रतिभा भोईर, महिला मोर्चाच्या शिल्पा म्हात्रे, सी.के.ठाकूर, पी.के.ठाकूर, किशोर ठाकूर, जितेंद्र कडू, हरजीवन ठाकूर, 250ज्योती भोपी, नंदा ठाकूर, आशा म्हात्रे, कुसुम ठाकूर, कुसुम विजय ठाकूर, लता ठाकूर, रजनी पांडुरंग ठाकूर, सुजाता ठाकूर यांसह अनेक मान्यवर आणि महिला उपस्थित होत्या.

## पनवेलच्या वडाळे तलावाला अश्लीलतेचा विळखा; प्रेमीयुगुलांच्या उच्छादामुळे नागरिक त्रस्त

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहराच्या शिरपेचातील मानाचा तुरा समजला जाणारा ऐतिहासिक 'वडाळे तलाव' सध्या एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आला आहे. महापालिकेने कोट्यवधी रुपये खर्च करून सौंदर्याने नटवलेल्या या तलावाच्या परिसरात सध्या प्रेमीयुगुलांनी अक्षरशः उच्छाद मांडला असून त्यांच्या अश्लील चाळ्यांमुळे सर्वसामान्य नागरिकांना येथून चालणेही कठीण झाले आहे.

वडाळे तलाव हा पनवेल आणि परिसरातील नागरिकांसाठी मुख्य आकर्षणाचे केंद्र आहे. सकाळ-संध्याकाळ आबालवृद्ध येथे विरंगुळा म्हणून आणि व्यायामासाठी येत असतात. लहान मुलांसाठी खेळणी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याची उत्तम सोय असल्याने येथे नेहमीच गर्दी असते. मात्र, गेल्या काही काळापासून या सौंदर्याला अश्लीलतेचे गालबोट लागले आहे. तलावाच्या काठावर आणि बागेत प्रेमी युगुलांची मोठी गर्दी असते. मात्र, ही युगुलं सार्वजनिक ठिकाणाचे भान न राखता खुलेआम अश्लील चाळे करताना दिसतात. विशेष म्हणजे, परिसरात सुरक्षारक्षक तैनात असूनही त्यांच्यावर कोणाचाही धाक उरलेला नाही. सुरक्षारक्षक अनेकदा याकडे दुर्लक्ष करतात किंवा त्यांना हटकले तरी ही मुले जुमानत नसल्याचे चित्र आहे.

येथून ये-जा करणाऱ्या महिला आणि कुटुंबासोबत येणाऱ्या नागरिकांना या दृश्यांमुळे मान खाली घालावी लागत आहे. "आम्ही मुलांना घेऊन या ठिकाणी फिरायला येतो, पण येथील वातावरण पाहून मुलांवर काय संस्कार होणार? असा प्रश्न पडतो," अशी संतप्त प्रतिक्रिया एका स्थानिक नागरिकाने दिली. अनेकदा नागरिकांना येथून जाताना लज्जास्पद वाटते, ज्यामुळे येथील गर्दी आता ओसरू लागली आहे. शहराचे सौंदर्य वाढवणाऱ्या या प्रेक्षणीय स्थळाचे पावित्र्य राखण्यासाठी पोलिसांनी आणि महानगरपालिका प्रशासनाने कठोर पावले उचलण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

केवळ सुरक्षारक्षक नेमून उपयोग नाही, तर अशा टवाळखोरांवर आणि अश्लील चाळे करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

## फोटो, व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन २० लाख लुटले

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर येथे राहणाऱ्या महिलेसोबत जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित करून नग्न फोटो आणि व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी दिली आणि २० लाख रुपये उकळल्या प्रकरणी आरोपी रमेश ज्ञानदेव ढोपरे (वय ३६, हमाली, रा. एपीएमसी मार्केट वाशी मुळगाव : बनपुरी, पाटण, सातारा) याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात १२ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

यातील पीडित फिर्यादी खारघर येथे राहत आहेत. २०१३ ते २०२२ पर्यंत आरोपी रमेश ढोपरे याने फिर्यादी यांच्याशी ओळख केली आणि त्या मुलांसह एकट्या राहावयास आहेत याची माहिती घेऊन फिर्यादी यांनी त्यांच्या मुलाच्या गळ्याला कटर ब्लेड लावून त्यांच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले तसेच त्यांचे नग्न फोटो आणि व व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी दिली आणि त्यांच्याकडून रोख, बँक आणि ऑनलाइन स्वरूपात वीस लाख रुपये उकळले.




## महिलेची आर्थिक फसवणूक

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

मेट्रोमोनी साईटवरून लग्न करण्यास पसंती दर्शवून वेगवेगळी कारणे सांगून महिलेकडून २१ लाख १४ हजार रुपये घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात ११ मे रोजी अनोळखी ईसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

२० सप्टेंबर २०२५ ते ३० जानेवारी २०२६ रोजी पीडित फिर्यादी यांनी मेट्रोमोनी साइटवर दिलेल्या प्रोफाइलवरून त्यांच्या मोबाईल क्रमांकावर समीर पांड्या (राहणार युनायटेड किंगडम) यांनी संपर्क साधला आणि तो डॉक्टर असल्याचे सांगून त्यांच्यासोबत लग्न करण्यास पसंती दर्शवली.

त्यानंतर त्यांचे व्हाट्सअपवर बोलणे आणि चॅटिंग सुरू झाले. यावेळी आरोपी हा त्यांना मुंबईला भेटण्यासाठी येत असताना त्याला दिल्ली विमानतळ येथे इमिग्रेशन विभागातील अधिकारी यांनी जास्त प्रमाणात पैसे घेऊन आल्याच्या कारणावरून पकडले असून त्याला सोडवण्यासाठी इंटरनॅशनल टॅक्स सर्टिफिकेट तसेच अँटी मनी लॉन्ड्रींग सर्टिफिकेटसाठी पैसे पाठवण्यास सांगितले.

यावेळी व्हाट्सअप वर दिलेल्या वेगवेगळ्या खात्यावर फिर्यादी महिला यांनी २१ लाख १४ हजार रुपये पाठवले. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

## जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कूल आवरेचा दहावीचा १०० टक्के निकाल

**उरण : बातमीदार**

'विद्वान सर्वत्र पूजते' हे ब्रीदवाक्य सार्थ ठरवत आवरे येथील जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कूलने आपला यशाचा आलेख यावर्षीही उंचावत ठेवला आहे. फेब्रुवारी-मार्च २०२६ च्या माध्यमिक शालांत परीक्षेत विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला असून, विद्यालयाने स्थापनेपासूनची 'शतप्रतिशत' निकालाची परंपरा यंदाही मोठ्या अभिमानाने कायम राखली आहे.




यावर्षीच्या निकालात विद्यार्थिनींनी बाजी मारली असून, दोन विद्यार्थिनींनी समान ८२.२०% गुण मिळवून प्रथम क्रमांकाचा बहुमान विभागून मिळवला आहे.प्रथम क्रमांक (संयुक्त): कु. दिशा उदय म्हात्रे (८२.२०%) आणि कु. श्रुती ऋषिकेश म्हात्रे (८२.२०%) द्वितीय क्रमांक: कु. कार्तिकी भारत पाटील (८०.४०% तृतीय क्रमांक: कु. भक्ती अयोध्या म्हात्रे (७८%)

हे विद्यालय म्हणजे स्वर्गीय अशोक ठाकूर सर यांच्या शैक्षणिक स्वप्नातून उभे राहिलेले एक मंदिर आहे. आज अशोक ठाकूर नसले तरी, त्यांच्या विचारांचा वारसा या यशाच्या रूपाने जिवंत असल्याचे पाहायला मिळाले. परीक्षेत यशस्वी झालेल्या सर्व २३ विद्यार्थ्यांनी आपले हे घवघवीत यश साश्रू नयनांनी आणि अत्यंत कृतज्ञतापूर्वक लाडके स्वर्गीय अशोक ठाकूर यांच्या पवित्र स्मृतीस अर्पण केले आहे. "सरांनी पाहिलेले स्वप्न आम्ही आमच्या कष्टाने पूर्ण केले," अशी भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल आत्माराम ठाकूर मिशन संस्थेचे अध्यक्ष प्रतीक ठाकूर, खजिनदार वामन ठाकूर , विश्वस्त अलका ठाकूर , सिंधू ठाकूर , आदिनाथ ठाकूर ,प्रसाद ठाकूर, रीना ठाकूर , मुख्याध्यापिका निकिता म्हात्रे व शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## उरणमध्ये शनिदेव जन्मोत्सव सोहळा

**उरण : वार्ताहर**

सालाबाद प्रमाणे यंदाही शनिदेव जन्मोत्सव सोहळागणपती चौक उरण येथे आयोजित करण्यात आला आहे.

सदर सोहळा शनिवार ( दि. १६ )मे रोजी असून यानिमित्ताने भजन ,तिर्थ प्रसाद ,महाप्रसादाचे आयोजनकरण्यात आले आहे

मंडळाचे अध्यक्ष अशोक कडू ,उपाध्यक्ष महेश अधिकारी,सचिव ॲड .रोहित पाटील ,खजिनदार धनंजय भागवत,सल्लागार विठ्ठल ममताबादे, सहसचिव ॲड. रेखा पाटील, सहखजिनदार मनोज म्हात्रे, जेष्ठ सल्लागार मधुकर नाईक, व्यवस्थापक निर्मला ममताबादे, नितीन वर्तक, रघुनाथ हातनोलकर, भालचंद्र म्हात्रे, गणेश ढोले, जगदीश भोईर, शैलेश राऊत आदींचे सहकार्य मिळणार आहे .

## कामगारांना दर्जेदार आरोग्य सुविधा देण्यासाठी इएसआय यंत्रणा सक्षम करण्यास सरकार कटिबद्ध

**उरण : बातमीदार**

महाराष्ट्रातील सुमारे ४९ लाख सभासद व १ कोटी ९२ लाख लाभधारक असलेल्या कामगार राज्य विमा योजना राज्य कामगार विमा योजना (ESIS) अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात इएसआय (ESI )रुग्णालये आणि प्रत्येक औद्योगिक क्षेत्रात दवाखाने सुरू करण्यात येतील, अशी महत्त्वपूर्ण हमी महाराष्ट्राचे कामगार मंत्री नामदार मा आकाश फुंडकर व आरोग्यमंत्री नामदारमा प्रकाश आबीटकर यांनी दिली.



दिनांक १२ मे रोजी मंत्रालयात कामगार मंत्र्यांच्या दालनात उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली होती.बैठकीस कामगार राज्य विमा योजना आयुक्त रमेश चव्हाण, संचालक श्रीमती अनुलेखा झा, रिजनल डायरेक्टर, कामगार आयुक्त डॉ. एच. पी. तुम्मोड, कामगार उपायुक्त लक्ष्मण भुजबळ तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

भारतीय मजदूर संघाच्या वतीने महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष ॲड. अनिल ढुमणे, प्रदेश उपाध्यक्ष सचिन मेंगाळे, कोशाध्यक्ष ॲड.बाळकृष्ण कांबळे, पुणे जिल्हाध्यक्ष अर्जुन चव्हाण, सुरेश पाटील, रायगड जिल्हाध्यक्ष अशोक निकम, नागपूर सेक्रेटरी हर्षल ठोंबरे, सोनावणे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

भारतीय मजदूर संघाने मांडलेल्या मुद्द्यांशी सरकारने सहमती दर्शवून राज्यातील मंजूर १८ नवीन इएसआय रुग्णालयांचे काम तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. तसेच प्रत्येक औद्योगिक क्षेत्रात इएसआय (ESI) दवाखाने सुरू करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले.

प्रत्येक कामगाराला इएसआय योजनेची माहिती मिळावी, प्रत्येक जिल्ह्यातील उपलब्ध दवाखाने व रुग्णालयांची माहिती सुलभ व्हावी यासाठी जनजागृती मोहीम राबविण्याचे निर्देशही देण्यात आले. औद्योगिक वसाहतींमध्ये माहिती शिबिरे आयोजित करण्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

बैठकीत कंत्राटी कामगारांच्या हिताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा निर्णय स्पष्ट करण्यात आला की कंत्राटदार बदलला तरी कामगारांचा जुना ESI नंबर कायम सुरू राहील.

## 'देश मजबूत करायचा असेल तर नागरिकांनी जबाबदारी स्वीकारली पाहिजे '

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देश मजबूत करायचा असेल, तर केवळ सरकारकडून अपेक्षा ठेवून चालणार नाही.प्रत्येक नागरिकाने स्वतःची जबाबदारी ओळखूनराष्ट्रहितासाठी सकारात्मक भूमिका घेतली पाहिजे, असे मत आदर्श शैक्षणिक समूहाचे चेअरमन तथा भाजप पदवीधर प्रकोष्ठचे प्रदेश संयोजक धनराज विसपुते यांनी व्यक्त केले.



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशहित, स्वच्छता, बचत, आत्मनिर्भरता आणि पर्यावरणपूरक जीवनशैली याबाबत केलेले आवाहन योग्य असल्याचे सांगत, नागरिकांनी त्याकडे राजकीय दृष्टिकोनातून नव्हे, तर सामाजिक जबाबदारी म्हणून पाहिले पाहिजे, असे विसपुते म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, देशाची प्रगती केवळ शासनाच्या योजना, धोरणे किंवा घोषणांवर अवलंबून नसते. नागरिकांची शिस्त, कर्तव्यभावना, कायद्याचे पालन, सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण, स्वच्छतेची सवय आणि राष्ट्रहिताचा विचार या बाबी देशाला अधिक सक्षम बनवतात.देश मजबूत करायचा असेल, तर प्रत्येक नागरिकाने आपल्या जीवनात सकारात्मक बदल केले पाहिजेत.

# द्रोणागिरीच्या प्रवेशद्वारावरच कचऱ्याने 'स्वागत'; सिडकोचा स्वच्छतेचा दावा फोल

**उरण : प्रतिनिधी**

सिडको प्रशासन एकीकडे 'स्वच्छ शहर' मोहिमेचा गाजावाजा करत असताना, द्रोणागिरी नोडच्या प्रवेशद्वारावरच कचऱ्याचे भीषण साम्राज्य पसरले आहे.उरण तालुक्यातील खोपटे रोडकडून द्रोणागिरीकडे येताना रस्त्याच्या दुतर्फा साचलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमुळे या परिसराला डम्पिंग ग्राऊंडचे स्वरूप आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, आजूबाजूच्या ग्रामपंचायतींच्या कचरा गाड्याही याच ठिकाणी कचरा आणून टाकत असल्याने ही समस्या अधिक गंभीर बनली आहे.



या डम्पिंग ग्राऊंडवर ओला आणि सुका कचरा एकत्रित टाकला जात असल्याने तो कुजून प्रचंड दुर्गंधी पसरली आहे. यामुळे नागरिक आणि वाहनचालकांना नाकावर रुमाल धरल्याशिवाय प्रवास करणे अशक्य झाले आहे. या घाणीमुळे परिसरात गिधाडे, उंदीर आणि भटक्या कुत्र्यांचा वावर वाढला असून, आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पोटाची खळगी भरण्यासाठी काही भटके लोक या घाणीतून प्लास्टिक वेचताना दिसतात, ज्यांच्या आरोग्याकडेही प्रशासनाचे दुर्लक्ष आहे.

केवळ कचराच नाही, तर द्रोणागिरी नोडमध्ये अनेक ठिकाणी ड्रेनेजची झाकणे उघडी आहेत. या उघड्या चेंबरमधून दुर्गंधीयुक्त सांडपाणी रस्त्यावर येत असून त्यामुळे परिसरात डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. रात्रीच्या वेळी हे उघडे ड्रेनेज अपघातांना निमंत्रण देत आहेत.

सध्या सिडकोकडून रस्त्यावरील दुभाजकांना काळया-पिवळ्या रंगाने रंगवण्याचे काम सुरू आहे वाहन चालकांना दुभाजक दिसावेत हा हेतू चांगला असला तरी डोळ्यांना दिसणारे रंगापेक्षा नाकाला येणारी दुर्गंधी सिडको प्रशासनाला का जाणवत नाही असे रहिवाशी विचारत आहे.

कचरा साठायच्या आतच त्याची विल्हेवाट लावणे गरजेचे असताना प्रशासन केवळ रंगरंगोटीच्या कामात मग्न असल्याचे चित्र दिसत आहे.

## उरणच्या द्रोणागिरीमध्ये १७ मे रोजी विराट हिंदू संमेलनाचे आयोजन

**उरण : बातमीदार**

सकल हिंदू समाज, द्रोणागिरी (उरण) यांच्या वतीने येत्या रविवारी, १७ मे २०२६ रोजी एका भव्य 'विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. हिंदू संस्कृतीचे जतन आणि समाजातील एकजूट वाढवण्याच्या उद्देशाने आयोजित हा सोहळा उरण तालुक्यातील द्रोणागिरी येथील सेक्टर ५०, देवकृपा सोसायटी समोर संध्याकाळी ६ वाजता संपन्न होणार आहे.

या संमेलनासाठी कोकण प्रांताचे धर्म जागरण प्रमुख राजेश कुंटे हे मुख्य वक्ते म्हणून उपस्थित राहणार असून ते उपस्थितांना मार्गदर्शन करतील. तसेच, या सोहळ्याला श्री श्री १००८ महामंडलेश्वर रामकृष्णानंद सरस्वती महाराज (वहाळ) आणि रमेश महाराज यादव (उरण) यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लाभणार आहे.या विराट संमेलनाची सुरुवात एका भव्य दिंडी सोहळ्याने होणार आहे. त्यानंतर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात येईल. मान्यवरांच्या मार्गदर्शनासह हिंदू धर्मातील विचारांचे आदान-प्रदान हे या सोहळ्याचे मुख्य आकर्षण असेल.द्रोणागिरी आणि उरण परिसरातील समस्त हिंदू बांधवांनी या मंगलमय सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सकल हिंदू समाज, द्रोणागिरी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## संपादकीय

# समंजसपणा जपण्याचा काळ!


कोणत्याही आर्थिक संकटाचा सामना करावयाचा असेल, तर अगोदरचा सर्वात महत्वाचा उपाय काटकसर करणे हाच असतो. काटकसर करूनच आर्थिक अरिष्टांची तीव्रता कमी करता येते, हे यापूर्वीही सिद्ध झाले आहे.

**अमेरिका-इराण युद्धामुळे निर्माण झालेल्या ऊर्जासंकटाच्या काळात इंधनबचत आणि परकी गंगाजळीचे संरक्षण करण्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनास प्रतिसाद देण्याऐवजी त्याचेही राजकारण करणाऱ्यांनी ते खुशाल करावे, पण देशावरील या समस्येचे सावट गंभीर होत असताना वेळीच डोळे उघडले नाहीत, तर त्याची मोठी किंमत मोजावी लागेल याचीही जाणीव जपणे गरजेचे आहे. पंतप्रधानांच्या आवाहनानंतर यापूर्वीच्या पंतप्रधानांनी केलेल्या आवाहनाचे दाखले देत त्यांचे पोवाडे गाण्यास सुरुवात झाली, पण त्या वेळी देशातील जनतेने त्यांच्या आवाहनाची कोणत्याही प्रकारे खिल्ली न उडविता किंवा आपल्या अभिव्यक्तीस्वातंत्र्याचा वापर करून नाहक टीका न करता त्यांच्या आवाहनास प्रतिसाद देऊन राष्ट्रभक्तीचे आणि देशहिताच्या जाणिवांचे दर्शन घडविले होते. तेव्हाच्या परिस्थितीत त्या नेत्यांनी घेतलेल्या या निर्णयाचे निःसंशय स्वागतच झाले होते, पण त्याचा दाखला देत पंतप्रधान मोदी यांना जाब विचारणाऱ्या विरोधकांनी, पंतप्रधानांच्या सुरक्षा ताफ्यातील कपातीचा तसेच बचतीच्या अन्य मार्गांचा अवलंब केल्याच्या बातम्यांकडे कानाडोळा करणे हे केवळ राजकारण ठरते. पंतप्रधान मोदी यांनी जनतेस आवाहन केल्यानंतर स्वतःच्या सुरक्षा ताफ्यातील वाहनांमध्ये कपात केलीच, पण मोदी मंत्रिमंडळातील आणि ज्या राज्यांत भाजप व रालोआची सरकारे आहेत तेथेही काटकसरीच्या उपाययोजनांचा विनाविलंब अवलंब सुरू झाला याची नोंदही घ्यावयास हवी. महाराष्ट्रातील विधिमंडळ सदस्यांचे एक शिष्टमंडळ जपानच्या दौऱ्यावर जाणार होते. त्यांचा हा दौरा पूर्वसमंत होता. पण मोदी यांच्या आवाहनानंतर तो रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे, अशा देशहिताच्या कोणत्याही उपायांस सहकार्य करून राष्ट्रहिताच्या जाणिवा जपणे हेच सद्यस्थितीत समंजसपणाचे ठरते. आगामी काळात तेलसंकट अधिक तीव्र होईल, अशी चिन्हे आताच दिसू लागली आहेत. अमेरिका आणि इराण यांच्यात परस्परांची अडवणूक करण्याचे डावपेच सुरू असताना, हा खेळ आणखी किती काळ चालेल हे अद्याप स्पष्ट नसले, तरी या खेळाचे परिणाम काय असतील हे मात्र एव्हाना पुरते स्पष्ट झाले आहे. ते असेच सुरू राहिले तर आर्थिक घडी विस्कटू नये यासाठी आणखी कठोर उपाययोजना कराव्याच लागतील, यात दुमत असण्याचे कारण नाही. केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी या संभाव्य संकटाचे गांभीर्य अधोरेखित केले आहे, आणि या संकटामुळे भविष्यात इंधनाचे दर वाढतील असे संकेतही दिले आहेत. आर्थिक अस्थिरतेच्या काळात काटकसर करण्याचे आवाहन याआधीही अनेकदा देशाच्या नेतृत्वाने केले होते. आजच्या स्थितीमुळे देशातील तेल कंपन्यांना दररोज एक हजार कोटींचे नुकसान सोसावे लागत असतानाही, इंधनाचे दर स्थिर ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केंद्र सरकारकडून होत आहे, याचीही नोंद घ्यावयास हवी. जागतिक पातळीवर इंधन संकटाच्या झळा सामान्यांच्या घरांपर्यंत पोहोचू लागल्या आहेत. ते पाहता, भारतात अजूनही काहीसे आश्वस्त वातावरण दिसते. मात्र, ही स्थिती कायम ठेवणे ही सरकार किंवा कोणत्याही अंतर्गत यंत्रणेच्या आवाक्यातील बाब नाही. त्यामुळे इंधन दरवाढीचे संकट अटळ आहे, हे गृहीत धरूनच उपायांचा आग्रह धरावा लागत असेल, तर त्याची खिल्ली उडविण्याचे राजकारण अंगलट येऊ शकते, याचे भान राखणेदेखील गरजेचे आहे.**

# ज्येष्ठ निरूपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी

ज्येष्ठ निरूपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी याचे मूळ नाव दत्तात्रेय नारायण धर्माधिकारी आहे. त्यांचा जन्म १४ मे १९५१ रोजी झाला. ते महाराष्ट्रातील एक भारतीय समाजसेवक आहेत. आप्पासाहेब धर्माधिकारी हे नानासाहेब धर्माधिकारी यांचे पुत्र आहेत. नानासाहेब यांच्या पावलावर पाऊल टाकत आप्पासाहेब हे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, निशुल्क रक्तदान शिबिर, रोजगार मेळावे, स्वच्छता मोहीम, अंधश्रद्धा निर्मूलन, अनेक व्यसनमुक्ती केंद्र इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन त्यांनी केले. २०१४मध्ये डी. वाय. पाटील विद्यालय नेरुळ यामध्ये त्यांना विद्यालंकार ही पदवी देऊन सन्मानित केले होते. २०१७मध्ये ते सर्वोच्च भारतीय नागरी सन्मान पुरस्कार पद्मश्रीने सन्मानित करण्यात आले.

आप्पासाहेब धर्माधिकारी हे रायगड जिल्ह्यात समाजसेवेचे काम करत असून ज्येष्ठ निरूपणकार म्हणून ओळखले जातात. राज्यभरात लाखोंच्या संख्येने त्यांचे अनुयायी असून रेवदंडा या त्यांच्या कर्मभूमीत नेहमीच गर्दी असते. आप्पासाहेब धर्माधिकारी हे महाराष्ट्रातील ओळखले जाणारे महत्त्वाचे समाजसेवक आहेत. अनेक राज्यातील पक्षांतील नेते त्यांना आणि त्यांच्या कुटुंबाला गुरू मानतात. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेही ते गुरू आहेत. त्यांच्यासह अनेक मान्यवर व्यक्ती आप्पासाहेब यांना आपले गुरू मानून त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी रेवदंडा येथील निवासस्थानी भेट देत असतात.



अलीकडच्या काळातील मोठ्या सामाजिक परिवर्तनाच्या यशस्वी चळवळीचे प्रत्यंतर देत आले आहे. धर्माधिकारी घराण्यात चारशे वर्षांपासून समाजप्रबोधनाच्या कार्याची परंपरा आहे.

आप्पासाहेब धर्माधिकारी यांचे वडील नानासाहेब धर्माधिकारी हेसुद्धा समाजसेवक होते. धर्माधिकाऱ्यांच्या घरामध्ये ही परंपरा चारशे वर्षांपासून चालू आहे. नानासाहेब धर्माधिकारी यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक पुरस्कार, शिवराज प्रतिष्ठान पुरस्कार, महाराष्ट्र युवा प्रतिष्ठानचा महाराष्ट्र गौरव पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित केले आहे आणि त्यांना मरणोत्तर महाराष्ट्र भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. जेव्हा हा पुरस्कार त्यांना देणार होते त्या वेळी खारघर येते ५१०एकरच्या जमिनीत चाळीस लाखांहून अधिक लोक जमा झाले होते. या गर्दीची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली आहे.

**वृक्ष लागवडीमध्ये पुढाकार**

हवामानातील बदल आणि त्याचे तापमानावर होणारे परिणाम लक्षात घेऊन वृक्षलागवड करून त्यांची जोपासना करण्याचे कार्य नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने हाती घेण्यात आले. प्रतिष्ठानच्या वतीने २०१५ ते २०२१ या कालावधीत एकूण ३६ लाख ६१ हजार ६११ वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. तीन लाख २१ मनुष्यबळ वापरण्यात आले. या वृक्षांची जोपासनाही श्री सदस्यांकडून केली जात आहे. आंतरिक स्वच्छतेबरोबर परिसर स्वच्छतेला महत्त्व द्यायला हवे, अशी शिकवण अप्पासाहेबांनी आपल्या अनुयायांना दिली. या शिकवणीतून नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानने स्वच्छता मोहिमेला सुरुवात केली. रस्ते, नाले, गाळाने भरलेले तलाव, समुद्रकिनारे यांची स्वच्छता करण्याचे कार्य श्री सदस्यांनी हाती घेतले. गावाच्या वेशीपासून सुरू झालेला हा उपक्रम हळूहळू शहरांच्या चौकाचौकांपर्यंत येऊन पोहचला. प्रतिष्ठानच्या वतीने आत्तापर्यंत १४० स्वच्छता अभियाने राबविण्यात आली. २० लाख २३ हजार ३६९ श्री सदस्य सहभागी झाले. एक लाख १५ हजार २३ टन कचऱ्याचे संकलन करण्यात आले.

याशिवाय विहिरींचे पुनर्भरण, जलस्रोतांची स्वच्छता, निर्माल्य संकलनातून खतनिर्मितीचे उपक्रम राबविले आहेत. आध्यात्माला सामाजिक उपक्रमांची जोड दिल्याने लाखो अनुयायी त्यांच्या कार्यात जोडले गेले आहेत.

**मिळालेले पुरस्कार**

आप्पासाहेबांच्या या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना डी. वाय. पाटील विद्यापीठाने मानद डॉक्टरेट पदवी प्रदान केली. माजी राज्यपाल विद्यासागर राव यांनी त्यांची राज्याचे स्वच्छतादूत म्हणून नियुक्ती केली होती, तर २०१७मध्ये केंद्र सरकारने पद्मश्री हा नागरी सन्मान देऊन सन्मानित केले. युरोपियन इंटरनॅशनल इन्स्टिट्यूटने अप्पासाहेबांना लिव्हिंग लिजंड पुरस्कार देऊन सन्मानित केले. त्यांच्या या कारकिर्दीची दखल घेऊन राज्य सरकारने त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित केले. **(साभार : इंटरनेट)**

# स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज

छत्रपती शिवाजी महाराजांनंतर स्वराज्याची धुरा आपल्या खांद्यावर समर्थपणे वाहिली ती छत्रपती संभाजीराजे यांनी. आज छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाच्या जशा अनेक गाथा सांगितल्या जातात; त्याचप्रमाणे एका गद्दार व्यक्तीमुळे त्यांचा दुर्दैवी अंत झाला.

छत्रपती संभाजीराजे औरंगजेबाच्या तावडीत जिवंत सापडले आणि त्यांनी धर्म परिवर्तनाला नकार दिल्यामुळे औरंगजेबाने त्यांचे केलेले हाल आणि त्यांची हत्या याबद्दल हळहळ व्यक्त केली जाते, मात्र या महापराक्रमी व्यक्तीने आपल्या जेमतेम नऊ वर्षांच्या स्वराज्याच्या कारकीर्दीत मोगल, गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याचा सिद्दी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना चांगलंच जेरीस आणल होते.

संभाजी महाराजांचा जन्म १४ मे १६५७ रोजी किल्ले पुरंदर येथे झाला. संभाजीराजांच्या आईसाहेब सईबाईंचं अकाली निधन झालं. त्यानंतर माता जिजाऊंनी संभाजी महाराजांच्या पालनपोषणाकडे लक्ष दिले. जिजाऊंसोबत पुण्याजवळील कापूरहोळ येथील धाराऊ नावाच्या महिलेने महाराजांचे संगोपन केले.

वयाच्या अवघ्या १८व्या वर्षी संभाजी महाराज स्वराज्याचे युवराज




तर केवळ २३व्या वर्षी स्वराज्याचे छत्रपती झाले. राजकारण अगदी कमी वयातच शिकण्याची संभाजी महाराजांची जबरदस्त इच्छा होती. त्यामुळे त्यांनी मुघल दरबार आणि तिथं होणारं राजकारण कसं असतं हे अगदी बालपणीच पाहिलं होतं.

केवळ चौदाव्या-पंधराव्या वर्षी संभाजी राजांनी साहित्य, कविता यांच्यात रस घेतला आणि याच काळात छत्रपती संभाजी महाराज संस्कृत पंडित झाले. बुधभूषणम या संस्कृत ग्रंथासह इतर भाषेतले तीन ग्रंथही छत्रपती संभाजी महाराज यांनी लिहिले.

छत्रपती शिवाजी महाराजांसोबत वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी संभाजीराजे आग्र्याला गेले. त्यानंतर आग्र्याहून सुटकेचा एकएक क्षण त्यांनी आपल्या पित्यासोबत अनुभवला. आग्रा येथून सुटका करून घेऊन शिवाजी राजे मजल दरमजल करत राजधानीत परतले, पण सुरक्षिततेसाठी संभाजीराजांना काही काळ मथुरेत ठेवण्यात आलं होतं.

शिवरायांचे स्वराज्याचे स्वप्न पूर्णत्वास नेण्यासाठी संभाजीराजे महाराजांच्या मृत्यूनंतर नऊ महिन्यांनी छत्रपतींच्या गादीवर विराजमान झाले. रायगडावरच संभाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. १६ जानेवारी १६८१ रोजी महाराष्ट्रातील रायगड किल्ल्यावर छत्रपती संभाजींचा भव्य राज्याभिषेक झाला. अशा या शूर राजाचे ११ मार्च १६८९ रोजी निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# अंतराळ संशोधन : पृथ्वी ते ताऱ्यांपर्यंतची झेप

माणसाला नेहमीच आकाशात काय आहे हे जाणून घ्यायची ओढ लागली आहे. रात्रीच्या आकाशात चमकणारे तारे पाहून प्राचीन काळापासून ऋषीमुनींनी ग्रह-ताऱ्यांच्या हालचालींचा अभ्यास केला. पण ती केवळ निरीक्षणाची पातळी होती. खऱ्या अर्थाने अंतराळ संशोधनाला सुरुवात झाली ती १९५७ मध्ये, जेव्हा सोव्हिएत रशियाने 'स्पुटनिक-१' हा पहिला कृत्रिम उपग्रह अवकाशात पाठवला. त्यानंतर माणसाने मागे वळून पाहिलेलं नाही. अंतराळ संशोधन म्हणजे पृथ्वीच्या पलीकडचं जग समजून घेण्याचा प्रयत्न. यात उपग्रह सोडणं,



चंद्रावर आणि मंगळावर यान पाठवणं, ताऱ्यांचा अभ्यास करणं, आकाशगंगेची रचना समजून घेणं या सगळ्यांचा समावेश होतो. भारतासाठी या क्षेत्रातली मोठी झेप होती २००८ मध्ये 'चांद्रयान-१'चं यश. या मोहिमेतून चंद्राच्या पृष्ठभागावर पाण्याचे अंश सापडले. त्यामुळे जगभरातल्या शास्त्रज्ञांचं लक्ष भारताकडे वेधलं गेलं. त्यानंतर २०१३ मध्ये 'मंगलयान' अर्थात 'मार्स ऑर्बिटर मिशन' यशस्वी झालं. सर्वात कमी खर्चात मंगळाच्या कक्षेत यान पोहोचवणारा भारत पहिला देश ठरला. २०२३ मध्ये 'चांद्रयान-३' ने चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळ यशस्वी लँडिंग करून इतिहास घडवला. ही कामगिरी करणारा भारत जगातला चौथा देश ठरला. अंतराळ संशोधनाचा फायदा फक्त शास्त्रापुरता मर्यादित नाही. आज आपण वापरत असले हवामान अंदाज, जीपीएस नेव्हिगेशन, दूरसंचार, आपत्ती व्यवस्थापन हे सगळं उपग्रहांच्या मदतीने चालतं. शेतकऱ्याला पिकाचा अंदाज, मच्छीमाराला समुद्रात मासे कुठे आहेत याची माहिती, पूर आणि वादळाची पूर्वसूचना हे सगळं अंतराळ तंत्रज्ञानामुळे शक्य झालं आहे. इस्रोच्या यशामागे एक महत्त्वाचा मुद्दा आहे तो म्हणजे कमी खर्चात मोठं काम करणं. पाश्चात्य देशांच्या तुलनेत भारताची अंतराळ मोहीम १० पटीने स्वस्त आहे. यामुळेच जगभरातले देश भारताकडून उपग्रह सोडून घेत आहेत, पण अंतराळ संशोधनात आव्हानेही कमी नाहीत. अंतराळात जाणं धोकादायक आहे. रॉकेट फेल होणं, यानाचं नियंत्रण सुटणं, अंतराळातील कचरा वाढणं हे मोठे प्रश्न आहेत. पृथ्वीभोवती हजारो मृत उपग्रह आणि त्यांचे तुकडे फिरत आहेत. त्यामुळे भविष्यातील मोहिमांसाठी धोका वाढत आहे. अंतराळ संशोधन म्हणजे माणसाची मर्यादा ओलांडण्याची जिद्द आहे. पृथ्वीवर प्रश्न संपले नाहीत, पण ताऱ्यांकडे पाहणं माणसानं सोडलं नाही. कारण तिथेच पुढच्या पिढीचं भविष्य दडलेलं आहे.

# दानशूर व्यक्तिमत्त्व रामशेठ ठाकूर

आप्पांचा अभिष्टचिंतन सोहळा आणि त्यासाठी येणाऱ्या पाहुण्यांची ही मोठमोठी नावे आणि त्यात माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीला आप्पांनी स्वतः फोन करून आमंत्रण देणे आणि त्यानंतर पत्रिका पाठवणे यातच मला जाणवते की त्यांची काम करण्याची शैली, प्रत्येक माणसाला धरून ठेवून जपण्याची कला ही अतिशय महत्त्वाची आणि योग्य आहे. आप्पांचे कार्य तसे मी फार जास्त पाहिले नाही, पण त्यांच्या कार्याचा जो इम्पॅक्ट मात्र मी पहिला. तळ्याचे गाव ते कॉस्मोपॉलिटीयन हा जो पनवेल शहराचा प्रवास आहे तो मी अनुभवला. सिडकोने वसवलेल्या या शहरात रामशेठ ठाकूर या नावाने किती गोष्टी सोप्या केल्या. या प्रत्येक गोष्टी गाववाल्या आणि सिडको अधिकाऱ्यांनी अनुभवलेल्या आठवणी आज या अभिष्टचिंतनाच्या दिनी लोकांना आठवतील आणि



लोकांच्या मनातील समुद्र आनंदाच्या अश्रूतून वाहतानाही अनेक ठिकाणी दिसेल. एकदा माझी भेट एअरपोर्टला झाली. त्यावेळीदेखील एअरपोर्ट अॅथॉरिटीचे मुख्याधिकारी यांच्याबरोबर बोलणे झाले. त्यावेळेस त्यांचे शब्द मला आठवतात. ते मला म्हटले की, साहेब लोकांना केवळ वरवरच्या गोष्टी दिसतात, मात्र ग्राउंड लेव्हलला आम्हाला ज्या अडचणी आल्या आणि त्यात ज्याने मार्ग काढून दिला ती व्यक्ती म्हणजे एकच रामशेठ ठाकूरसाहेब. त्यांच्याशिवाय हे एअरपोर्ट चालू होणे अशक्य होते. आज त्याचे श्रेय अनेक जण घेतील, पण हे आप्पांशिवाय शक्य नव्हते हे मुख्याधिकाऱ्यांकडून ऐकून जीव भरून आला. कारण मला आप्पा नेहमीच आपल्या घरातील वडीलधाऱ्या व्यक्तीप्रमाणे वाटतात. शिक्षणाचे महत्त्व जाणणारा राज्यकर्ता म्हणून त्यांची छाप तुम्हाला प्रत्येक सीकेटी शाळा आणि कॉलेजमधून दिसून येईल. त्यांनी केवळ बिल्डिंग उभारल्या नाहीत, तर त्यातून शिक्षणाचा दर्जा अगदी इंटरनॅशनल स्टँडर्डचा ठेवला. त्याचमुळे आज या संस्थेतील विद्यार्थी आयुष्यात वेगवेगळ्या क्षेत्रात प्रगतशील असलेले दिसतात. त्यांचा दानशूरपणा मी काय लिहावा, तो तर शरद पवार कुटुंबीयांनीदेखील अनुभवला आणि त्यांनी आप्पांना कर्णाचा किताबही दिला. माझ्या जीवनातही आप्पांचे फार मोठे मार्गदर्शन लाभले. डॉक्टर जरी झालो तरी समाजात वागण्याचे धडे बऱ्याच वेळा त्यांनी मला दिले. मला एकदा ओरडल्यापासून आजही मी त्यांच्यासमोर टी-शर्ट घालत नाही. त्यांचे म्हणणे असते की मी नेहमी शर्ट पॅण्ट आणि व्यवस्थित टापटिपपणे रुग्णालयात यावे. टी-शर्ट घातला तर तोही सफेद आणि कॉलरचा असावा. एवढं प्रेम कोण करणार माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीवर.

आप्पांचा माझ्या जीवनावर खूप प्रभाव आहे. त्यांच्या मार्गदर्शनानेच पुढे चालत राहू. आप्पांना अमृत महोत्सवाच्या अनंत कोटी शुभेच्छा. पांडुरंग त्यांना उदंड, सुखी, समाधानी, निरोगी आयुष्य देवो, हीच पांडुरंगचरणी प्रार्थना.

**-डॉ. संतोष जाधव**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# चाळीशीनंतरचा आहार : शरीराला हवी नवी काळजी

चाळीशी ओलांडली की शरीरात हळूहळू बदल व्हायला लागतात. चयापचयाचा वेग कमी होतो, स्नायूंची झीज सुरू होते, हाडं ठिसूळ होतात आणि रोगप्रतिकारशक्तीही थोडी मंदावते. त्यामुळे वयाच्या २०-३० मधला आहार चाळीशीनंतर चालत नाही. शरीराला आता इंधन कमी पण पोषण जास्त हवं असतं. योग्य आहार हाच निरोगी वृद्धापकाळाचा पाया आहे. चाळीशीनंतर स्नायूंची झीज नैसर्गिकपणे सुरू होते. त्याला 'सार्कोपेनिया' म्हणतात. यासाठी आहारात पुरेसे प्रथिने असणं गरजेचं आहे. डाळी, मूग, चणा, सोयाबीन, अंडी,



मासे, दही, पनीर यांचा रोजच्या आहारात समावेश करा. दररोज शरीराच्या वजनाच्या प्रत्येक किलोला १ ग्रॅम प्रथिनं मिळतील असं नियोजन करा. प्रथिनं स्नायू टिकवतात आणि चयापचयाचा वेग राखतात. हाडं ठिसूळ होण्याची समस्या महिलांमध्ये रजोनिवृत्तीनंतर आणि पुरुषांमध्ये ५० नंतर वाढते. म्हणून आहारात दूध, दही, ताक, तीळ, राजगिरा, पालेभाज्या असाव्यात. सकाळी १५-२० मिनिटं उन्हात बसल्याने शरीराला व्हिटॅमिन डी मिळतं. गरज पडल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने पूरक आहार घ्या. चाळीशीनंतर इन्सुलिनचा प्रतिकार वाढतो. त्यामुळे मधुमेहाचा धोका वाढतो. गोड पदार्थ, पांढरा साखर, मैदा, तळले, पॅकबंद पदार्थ कमी करा. त्याऐवजी संपूर्ण धान्य, बाजरी, ज्वारी, नाचणी यांचा वापर करा. या धान्यात फायबर जास्त असतं. त्यामुळे पोट भरतं आणि साखर हळूहळू वाढते. सगळे चरबी वाईट नसतात. बदाम, अक्रोड, अळशीचे बी, चिया सीड्स, ऑलिव्ह ऑइल, तूप यातले चांगले चरबी हृदयासाठी उपयुक्त आहेत. हे कोलेस्ट्रॉल नियंत्रित करतात आणि मेंदूचं कार्य सुधारतात. पण प्रमाण मर्यादित ठेवणं महत्त्वाचं आहे. वयानुसार पचनक्रिया मंदावते आणि बद्धकोष्ठतेचा त्रास वाढतो. यासाठी रोज २.५ ते ३ लिटर पाणी प्या. आहारात फळं, भाज्या, सलाड, ओट्स, इडली-उप्पिट सारखे फायबरयुक्त पदार्थ ठेवा. फायबर पोट साफ ठेवतो आणि कोलेस्ट्रॉलही कमी करतो. उच्च रक्तदाब ही चाळीशीनंतरची सामान्य समस्या आहे. त्यासाठी बाहेरचं खाणं, पॅकबंद सूप, लोणचं, पापड यातलं मीठ कमी करा. घरचं कमी मीठाचं जेवण हेच सुरक्षित आहे. एकाच वेळी भरपूर खाण्याऐवजी दिवसातून ४-५ वेळा थोडं थोडं खा आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कधीही सकाळचा नाश्ता चुकवू नका.

# १६७ कोटींच्या प्रकल्पातून मच्छीमारांना नवी दिशा

## ■ मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते भरडखोल आधुनिक मत्स्यबंदराचा शुभारंभ

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री मत्स्य संपदा योजना जाहीर केली आहे. त्यामुळे अर्थसंकल्पामध्ये २१२ कोटी रुपयांची तरतूद असलेले मत्स्य व्यवसाय खाते आता १ हजार २४० कोटी रुपयांवर गेले आहे. भरडखोल येथे होत असलेल्या कामाचा दर्जा चांगलाच असेल, यात शंका नाही. हे काम दोन वर्षात पृष्ठ पद्धतीने पूर्ण केले जाईल. त्यामुळे मच्छीमार बांधवांची आर्थिक समृद्धी निश्चित होईल, असे प्रतिपादन मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणे यांनी बुधवारी येथे केले.



श्रीवर्धन तालुक्यातील भरडखोल येथे १३७.२२ कोटी निधीतून उभारण्यात येणाऱ्या मत्स्यबंदर विकासकामाच्या भूमीपूजन प्रसंगी ते बोलत होते. महाराष्ट्र सागरी मंडळाच्या सागरमला विकासकामांतर्गत रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील भरडखोल येथील मत्स्य बंदर विकास कामासाठी मंजूर झालेल्या १३७.२२ कोटी रुपये कामाचे भूमीपूजन खासदार सुनील तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली बंदर विकास मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर श्रीवर्धन सभापती सुचिन किर, जिल्हा परिषद सदस्या वासंती गुणाजी, म्हसळा सभापती बबन मनवे, पंचायत समिती सदस्य सुकुमार तोंडलेकर, भरडखोल सरपंच ज्योती काळपाटील, पदाधिकारी, भरडखोल मच्छिमार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सुनील तटकरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, गोव्यापेक्षा सुंदर समुद्रकिनारा कुठे असेल तर तो कोकणामध्ये, दिवेआगर येथे, तिथे मस्त्यालय व्हावं व एक उत्तम समुद्रकिनारा दिवेआगर येथे विकसित व्हावा, अशी मागणी त्यांनी केली तर भरडखोल तसेच श्रीवर्धन तालुक्यातील भागामध्ये उभारण्यात येत असलेल्या जेट्टीमुळे मच्छिमार बांधवांना लिलावो केंद्र उभारण्यात येईल. त्यामुळे विकास साधता येईल व भविष्यात मुंबईतील कुलाबा येथील ससून डॉक येथे जाण्याची वेळ येणार नाही.

मंत्री नितेश राणे म्हणाले की, या शासनाने मच्छिमारी व्यवसायाला कृषीचा दर्जा दिला आहे, इतर राज्याप्रमाणे महाराष्ट्रातील मच्छिमार बांधवांच्या घरची आर्थिक समृद्धी होईल. आम्ही जनतेच्या विकासासाठी सदैव सोबत असू.

त्यांनी मच्छिमार बांधवाना आवाहन केले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सात आवाहने केली आहेत. त्यामध्ये डिझेल व पेट्रोलचा वापर कमी करा, असे आवाहनही केले आहे. एका मोठ्या बोटीला महिन्याला ४ ते ५ लाख लिटर डिझेल लागते. त्यामुळे डिझेलच्या बोटी न वापरता इलेक्ट्रिकल बोटी वापरता येऊ शकतील का याचा विचार करावा.

# कर्जत तालुकास्तरीय कृषी मेळावा; भाताच्या वाणाची चर्चा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुकास्तरीय कृषी मेळावा भात संशोधन केंद्रात आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात कर्जत तालुक्यात निर्माण झालेल्या भाताच्या वाणांची चर्चा झाली. दोन सत्रात झालेल्या या मेळाव्यात प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला.



रायगड जिल्हा परिषद अलिबाग आणि पंचायत समिती कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय कृषी मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याचे उद्घाटन कर्जत पंचायत समितीच्या सभापती नमिता घारे यांच्या हस्ते झाले. यावेळी उपसभापती चित्रा ठाकरे, जिल्हा परिषद सदस्या सुनिता मोरे, उषा ठोंबरे, पंचायत समिती सदस्य नमिता श्रीखंडे, सुषमा पवाळी, नितिन धुळे, महेश खारीक, अक्षय तिटकारे, जिल्हा कृषी आधिकारी आकाश चव्हाण, तालुका कृषी अधिकारी राजाराम शिंदे, प्रादेशिक भात संशोधन केंद्राचे सहयोगी संशोधन संचालक भरत वाघमोडे, आत्मा समिती अध्यक्ष चंद्रकांत मांडे आदी उपस्थित होते.

उपस्थितांचे स्वागत पंचायत समिती कृषी अधिकारी संजय चव्हाण यांनी केले. त्यांनी प्रस्ताविकात शेतकऱ्यांनी लागवडीखाली जास्तीत जास्त क्षेत्र आणून अद्यावत उपकरणांच्या सहाय्याने शेती करावी, असे सूचित केले. भरत वाघमोडे यांनी भाताचे नवनवीन वाण शेतकऱ्यांनी पिकविल्या तरच भात शेतीमध्ये फायदा होऊ शकतो. एरव्ही पिकवत असलेल्या भातामध्ये सहा टक्के प्रथिने आहेत. आता जी भात पिकांचे वाण आहेत त्यामध्ये तेरा-चौदा टक्के प्रथिने असल्याने नुसता भात खाल्ला तरी चालू शकते, मात्र त्याच्या नियोजनासाठी कालावधी लागतो, असे सांगितले.

# विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करावे -जि.प. सदस्य विघ्नेश माळी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र दळवी यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थी समुपदेशनः जिल्हा परिषद सदस्य ज्योती नागावकर यांचा समाजोपयोगी कार्यक्रम सध्या जगात एआयसारख्या प्रगतशील तंत्रज्ञान क्रियेटिव्ह असून विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करावे, असे प्रतिपादन निर्वाचीत जि.प. सदस्य विघ्नेश माळी यांनी म्हाळुंगे बुद्रूक येथील दहावी व बारावी विद्याथ्यासाठी आमदार महेंद्र दळवी यांच्या वाढदिवसाचे निमित्ताने आयोजीत समुपदेशन व मार्गदर्शन शिबीरात संबोधीत करताना केले.



मुरुड, अलिबाग रोहा विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार महेंद्र दळवी यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थी समुपदेशनाचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महाळुंगे समाजमंदिरात दहावी आणि बारावीनंतर काय?, या विषयावर सुहास पाटील माजी आयुक्त उत्पादन शुल्क मुंबई यांनी मार्गदर्शनपर व्याख्यान दिले. विद्यार्थ्यांनी दहावी-बारावीनंतर कोणत्या अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यावा, विद्यार्थी व पालकांना भेडसावणाऱ्या समस्या, नोकरीच्या संधी आणि त्यांची तयारी यासंदर्भात शिक्षक, पालक यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.

# माणगावमध्ये मोफत नेत्र शिबिरात २५ रुग्णांची तपासणी

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवार १३ मे रोजी सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन महेंद्र पितांबर मेथा यांच्या प्रशस्त जागेत हॉलमध्ये जुने एसटी स्टॅन्डजवळ माणगाव याठिकाणी करण्यात आले होते.



या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोग तज्ज्ञ डॉ.प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन २५ रुग्णांची तपासणी करून १० नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. माणगावात गेली तीन वर्षांहुन अधिक काळात ४७ वेळा शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव येथील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यातर्फे मोफत नेत्ररोग व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात आतापर्यंत ४०१० हुन अधिक नेत्ररुग्णांवर यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आलेले आहेत. विजयशेठ मेथा समाजात सामाजिक बांधिलकी ठेवून काम करीत असल्याने ते अशा प्रकारचे विविध सामाजिक उपक्रम माणगाव तालुक्यात राबवतात. नेत्ररोग शिबिराला दरमहिन्याला उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत असून दक्षिण रायगडातून या शिबिराचा लाभ गरीब जनता घेत आहे.

## चिंचवली ग्रामपंचायत सरपंच नंदकुमार पारावे यांना पुरस्कार

**माणगाव :** माणगाव तालुक्यातील चिंचवली ग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच नंदकुमार पारावे यांना विवा कॉलेज एज्युकेशन सोसायटी संचलित माणगाव यांच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय "आदर्श सरपंच पुरस्कार" नुकताच जाहीर झाला आहे. त्यांच्या या निवडीमुळे चिंचवली गावासह संपूर्ण माणगाव तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. नंदकुमार पारावे यांनी सरपंच म्हणून कार्यभार स्वीकारल्यानंतर गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत.

---

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक १५/२०२६-२०२७ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... रोहा येथे ईएसआर परिसरात नवीन सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करणे. | ₹ १५,९३,९३६.०० |
| २ | रोहा पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती....रोहा पाणीपुरवठा योजनेच्या उर्ध्व मुख्य जलवाहिनीचा व जलवितरण वाहिन्याचा बिघाड दुरुस्त करण्यासाठी एक वर्षाच्या कालावधीकरिता वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ १५,७९,४९९.०० |
| ३ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील अनिवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती.... रोहा येथील विविध प्रिमायसेसना कीटक नियंत्रण सेवा पुरविणे. | ₹ ८,८४,०५२.०० |
| ४ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... रोहा औद्योगिक क्षेत्रातील ग्राहकांच्या नळजोडण्यावरील मीटरचे वाचन व केंद्रीय डेटा संकलनासाठी बिलिंग सॉफ्टवेअर वापरून, दोन वर्षांच्या कालावधीसाठी बिल गणनेकरिता मीटर वाचन व डेटा डिजिटलायझेशनच्या सेवा पुरविणे. | ₹ १२,२१,७८७.०० |
| ५ | रोहा येथील कार्यालयीन इमारतीमधील उप अभियंत्यांची केबिन आणि इतर केबिनची दुरूस्ती करणे. | ₹ ९,६५,००३.०० |
| ६ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन केंद्राची देखभाल व दुरूस्ती... रोहा औद्योगिक क्षेत्रात फायर हायड्रंट सिस्टीम व एमआयडीसी इमारतींच्या विविध परिसरांमध्ये अग्निशामक यंत्राचा पुरवठा करून बसविणे. | ₹ १५,०२,८४२.०० |
| ७ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती...... रोहा औद्योगिक क्षेत्रातील गंगा नाल्यातील गाळ काढून स्वच्छ करणे. | ₹ १४,२१,५१७.०० |
| ८ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील अनिवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती..... तळोजा औद्योगिक क्षेत्रातील एमआयडीसीच्या सीएफसी इमारतीच्या खराब झालेल्या कंपाऊंड भिंतीचे बांधकाम करणे. | ₹ ४०,२५,६६४.०० |
| ९ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती ... मान्सूनपूर्व काम... रोहा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्याच्या कडेच्या गटाराची साफसफाई, सीडीचे काम करणे . | ₹ १५,७४,०८०.०० |
| १० | तळोजा पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...... तळोजा औद्योगिक क्षेत्र व तळोजा फीडर रस्त्यामधील रस्त्यालगतचे, मोकळे भूखंड/जागा, राखीव भूखंड आणि सुविधा भूखंडांवरील अतिक्रमण हटवणे. (दुसरी मागणी) | ₹ १९,११,०१०.०० |

उपरोक्त अ.क्र. १ ते ९ वरील कामांबाबतचे निविदा प्रपत्र दिनांक १५/०५/२०२६ ते दिनांक २९/०५/२०२६ पर्यंत व अ.क्र. १० वरील कामाबाबतचे निविदा प्रपत्र दिनांक १५/०५/२०२६ ते दिनांक २५/०५/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १८/०५/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २०/०५/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

---

## रोहा अष्टमी नगर परिषद

ता. रोहा, जि. रायगड
पिन कोड नं. ४०२१०९
**फोन नं. कार्यालय-०२१९४-२३५५२० फॅक्स नं. ०२१९४-२३४०८७**
email : rohanagarpalika@gmail.com

**क्र.रोनप/आरोग्य/निविदा/४३७/२०२६-२७** **दिनांक :- १२/०५/२०२६**

### जाहिर ई-निविदा सूचना

रोहा अष्टमी नगर परिषदेद्वारे आरोग्य विभागाकरीता खालील कामासाठी अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून विहित नमुन्यात दरपत्रक /कोटेशन मागविण्यात येत आहे. विहीत नमुन्यातील सर्व अटी शर्तीसह निविदा पत्रे/फॉर्मची विक्री नगर परिषद कार्यालय, रोहा येथे कार्यालयीन वेळेत दिनांक १३/०५/२०२६ पासून दिनांक २०/०५/२०२६ रोजीपर्यंत कार्यालयीन वेळेत दुपारी ३.०० वाजेपर्यंत कामकाजाचे दिवशी रक्कम रुपये खाली नमुद केलेप्रमाणे नगर परिषद कार्यालयात रोखीने भरणा करुन निविदा पत्रे/फॉर्म प्राप्त करुन घेता येतील. अधिक माहितीसाठी नगर परिषदेच्या आरोग्य विभागात संपर्क साधावा

| क्र. | कामाचा तपशिल | इसारा रक्कम (रूपये) | कोरी निविदा फॉर्म फी (रूपये) | काम करणेची मुदत |
|---|---|---|---|---|
| १. | रोहा-अष्टमी नगर परिषद हद्दीतील पावसाळ्यापूर्वी नाले सफाई करणे बाबत. | ५०००/- | ५००/- | कामाचे आदेश दिलेपासून ९० दिवस |

**सही/-**
**(अजयकुमार एडके)**
**मुख्याधिकारी**
**रोहा अष्टमी नगर परिषद**

**सही/-**
**(कु. वनश्री अवनी समीर शेडगे)**
**नगराध्यक्षा**
**रोहा अष्टमी नगर परिषद**

---

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे काशिद, ता. मुरुड, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक कमर झमानबेगम खान, मुमताज जहाँन बेगमखान, अर्शद आदमजी जसदनवाला व सिद्दी शहा मेहबूब खान, सर्व रा. मुंबई यांच्या मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेली बागायत मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर माझे अशिलांनी केली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | नगर भूमापन क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| काशिद ता. मुरुड | १७/४/अ | ०-१८-९०<br>पो.ख. ०-१०-००<br>एकूण ०-२८-९० | ०.२८ |

**या मिळकतीपैकी ०-२२-६५ या मिळकतीबाबत**

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

**दिनांक : १४/०५/२०२६**

**सही/-**
**ॲड. विवेक रमेश साळवी**
**दुय्यम निबंधक कार्यालयासमोर,**
**अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.**

---

## पनवेल महानगरपालिका
## ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१० २०६

ई-मेल : panvelcorporation@gmail.com
pmc.townplanning@gmail.com
दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२
वेबसाईट - panvelcorporation.com

### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बांधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | मलनिस्सारण विभाग प्रमुख, पनवेल महानगरपालिका, पनवेल, | ०१ पिंपळ झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील **गाव. पडघे, ता. पनवेल, जि. रायगड** येथे भूखंडाच्या आवारातील ०१ झाड पडघे पार्किंग शौचालय येथील आउट पाइप लाईन च्या कामामध्ये बाधित होत आहे. |
| २ | M/s.Laxmi Buildtech., Plot No.- २६५+२६६+२६७, Sector-१९. Kharghar, Tal. Panvel, Dist.- Raigad. | ०३ जांभूळ झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील **प्लॉट नं. २६५+२६६+२६७, सेक्टर-१९, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड** येथे भूखंडाच्या आवारातील ०३ झाडे नवीन इमारत बांधकाम करणेस बाधित होत आहे. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/ पुनर्रोपण करणेस परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**उपायुक्त**
**तथा वृक्ष अधिकारी**
**पनवेल महानगरपालिका**

**जा.क्र** - PMC-PARK/199/2026-PTAD

---

## रोहा अष्टमी नगर परिषद

ता. रोहा, जि. रायगड
पिन कोड नं. ४०२१०९
email : rohanagarpalika@gmail.com

**क्र.रोनप/बांध/ई-निविदा सुचना/४५६/२०२६** **दिनांक :- १३/०५/२०२६**

### जाहिर ई-निविदा सूचना

"रोहा नगरपरिषद हद्दीतील विकास कामाकरिता कामाचा अनुभव असणाऱ्या ठेकेदाराकडून विहित नमुन्यात ई-निविदा मागविणेत येत आहेत. सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा सुचना प्रसिद्धी, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्र इत्यादी माहिती https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १४/०५/२०२६ रोजीपासून उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक २२/०५/२०२६ रोजीपर्यंत राहील.

**सही/-**
**(अजयकुमार एडके)**
**मुख्याधिकारी**
**रोहा अष्टमी नगर परिषद**

**सही/-**
**(कु. वनश्री अवनी समीर शेडगे)**
**नगराध्यक्षा**
**रोहा अष्टमी नगर परिषद**

# जलवाहिनी फुटल्याने हजारो लिटर पाणी वाया

## चिरनेर-कळंबुसरे रस्त्यावर पाण्याचे कारंजे

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिरनेर हायस्कूल नाक्याजवळ,चिरनेर - कळंबूसरे रस्त्यावर पुलाचे काम सुरु असलेल्या ठिकाणी काल सकाळी ६:४५ वाजताचे सुमारास बांधपाडा - खोपटे ग्रामपंचायतीला पाणी पुरवठा करणारी जलवाहिनी फुटल्याने दोन तासात भर रस्त्यावर मोठया प्रमाणात पाण्याच्या प्रेशरणे कारंजा उडत राहिल्याने हजारो लिटर पाणी वाया गेले.कडक उन्हाळ्याच्या दिवसात कित्येक ठिकाणी पाण्याची वणवण सुरु असतांना या हेटवणे पाणी पुरवठा योजनेच्या मुख्य जलवाहिनीतून चिरनेर हायवे रोड येथून जोडलेली बांधपाडा - खोपटे गावाकडे पाणी पुरवठा करण्यासाठी साकरण्यात आलेली जलवाहिनी सकाळच्या सत्रात फुटल्याने खोपटे येथील रहिवाशांची उन्हाच्या तडाक्यातच पाण्याची पुरती गैरसोय झाली होती.



फुटलेल्या जलवहिनीतून दोन तास स्वछ आणि निर्मळ असे पिण्याचे पाणी वाया जात असतांना रस्त्यावरील पादचारी आणि वाहनचालकांनी हे दृश्य समोर पाहत होते. परंतु पाण्याची विनाकारण होणारी नासाडी थांबविण्यासाठी येथील नागरिकांनी सहकार्य करून संबंधितांना कळवून वाया जाणारे पाणी बंद करून थांबविण्यात आले.मात्र सदरची जलवाहिनी बंद करून फुटलेली जलवाहिनी बांधपाडा ग्रामपंचायतीच्या वतीने प्लंबर आणि कामगारांनी युद्ध पातळीवर दुरुस्ती करून जोडण्यात आली.याशिवाय बंद करण्यात आलेला पाणी पुरवठाही सुरळीत करण्यात आल्याची माहिती ग्रामविकास अधिकारी राजेंद्र सातंगे यांनी दिली.

# नमुंमपा स्थायी समिती सभेत विविध कामांना मान्यता

**नवी मुंबई : बातमीदार**

विविध नागरी सेवासुविधांचे प्रस्ताव प्रशासनाच्या वतीने स्थायी समिती सभेत सादर करण्यात आले होते, त्यांना सभापती अशोक पाटील यांच्या अध्यक्षतेखाली १२ मे रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेत सदस्यांच्या चर्चेनंतर मंजूरी प्राप्त झाली.



यामध्ये उच्च न्यायालय मुंबई यांनी स्वतःहून दाखल करुन घेतलेल्या ( पीआयएल क्रमांक.३/२०२३ अन्वये पारित केलेल्या आदेशानुसार नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वाढते वायू प्रदूषण कमी करण्यासाठी विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने स्मशानभूमीमध्ये पारंपारिक पध्दतीने करण्यात येणा-या अंत्यविधीमुळे हवा प्रदूषणात होणारी वाढ कमी करण्यासाठी व हवा प्रदूषण निर्देशांक कमी करण्यासाठी घणसोली कौल आळी व तुर्भे से.१९ येथील स्मशानभूमीमध्ये पर्यावरण पुरक स्मशानभूमी बांधण्याचे काम प्रस्तावित करण्यात आले आहे. ही स्मशानभूमी एलपीजी व मॉडर्न वूड बेस्ड ट्रेडिशनल ग्रीन क्रिमॅटोरिअम स्टिस्टीम हायब्रीड क्रिमॅटोरिअम स्वरुपाची असून पारंपारिक स्मशानभूमीपेक्षा कमी लाकडामध्ये प्रेत दहन करणारी तसेच तीन ते चार पटीने कार्बन उर्त्सजन कमी करणारी आणि इतर हानीकारक गॅसेस कमी करणारी असणार आहे. या पध्दतीमुळे कमी खर्चात पारंपारिक पध्दतीने अंत्यविधी करता येणार आहे. सदर हायब्रीड क्रिमॅटोरिअम पध्दतीमध्ये सुरूवातीला २ स्मशानभूमींचे रुपांतर करणेसाठी रु. २ कोटी ८७ लक्ष रक्कमेच्या कामास स्थायी समितीची मंजूरी प्राप्त झालेली आहे.

शिक्षण विभागांतर्गत बालवाडी, प्राथमिक व माध्यमिक शाळेतील एकुण ५०,५५८ विद्यार्थ्यांना सन २०२६-२७ वर्षासाठी शालेय गणवेश, पी.टी. गणवेश व स्काऊट गाईड गणवेश पुरवठा करण्याकरिता रु. १३ कोटी ३३ लक्ष रक्कमेस मान्यता देण्यात आली. तसेच शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये बालवाडीत शिकणा-या साधारणतः ७४४६ विद्यार्थ्यांसाठी मुलभूत शिक्षणाच्या दृष्टीने लेखन साहित्याचा पुरवठा करणे कामी १ कोटी ३३ लक्ष रक्कमेस वित्तीय मान्यता देण्यात आली.

महानगरपालिकेच्या मोरबे धरण प्रकल्पांतर्गत ७ गावे व ८ वाड्या विस्थापित झालेल्या असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत या पुनर्वासित गावांना पाणी पुरवठ्यासह १३ नागरी सुविधा देण्यात आल्या होत्या. हे धरण महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून नवी मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरित झालेले असून १३ सुविधांपैकी देखभाल व दुरुस्तीसह पाणीपुरवठा सुविधा महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येत आहे. मोरबे गावाच्या पाणी पुरवठ्याकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने टाकलेली मुख्य जलवाहिनी साधरणतः २८ वर्ष जुनी झालेली असून ती वारंवार नादुरुस्त होत असल्याने नव्याने जलवाहिनी टाकणे व अनुषांगिक कामांसाठी रु.६५ लक्ष ८७ हजार रक्कमेच्या कामास स्थायी समितीची मंजूरी प्राप्त झालेली आहे.

स्थायी समितीपुढे आलेल्या विविध विभागांतील रस्ते सुधारणा विषयक प्रस्तावांमध्ये घणसोली विभागातील प्रगतीनगर भागात काही ठिकाणी अंतर्गत रस्ते खराब होण्याचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन यावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी प्रगतीनगर येथील सिध्दीविनायक अपार्टमेंट समोरील रस्त्याची टिडब्लूटी कॉंक्रिट पध्दतीने सुधारणा करणे व गटारे बांधणे अशा रु. १ कोटी ७१ लक्ष रक्कमेच्या कामास मंजूरी देण्यात आली. त्याचप्रमाणे कोपरखैरणे से.१९ सी येथील विस्तारित कोपरखैरणे गावठाण व तीनटाकी ते जिमी टॉवर येथील दूरवस्था झालेल्या रस्त्यांची टिडब्लूटी कॉंक्रिट पध्दतीने सुधारणा करण्याच्या रु.४ कोटी ७८ लक्ष रक्कमेच्या कामासही स्थायी समितीची मंजूरी प्राप्त झाली.

नवी मुंबईची ओळख 'उद्यानांचे शहर' अशीही असून शहरात २२५ हून अधिक उद्याने. बागा व सुशोभित जागा आहेत. यामधील से.१९ नेरुळमध्ये असलेले कल्पना चावला उद्यान विकसित करुन बरीच वर्ष झालेली असल्यामुळे तेथील हिरवळ व झाडे - झुडपे यांची लागवड करुन उद्यान सुशोभिकरणाची मागणी होत आहे. या करिता रु.३० लक्ष ५८ हजार रक्कमेच्या कामास मान्यता प्राप्त झाली आहे.

# आमदार मंदा म्हात्रे यांच्या माध्यमातून तुर्भे हनुमान मंदिरात महाप्रसादाचे वाटप

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

आमदार मंदा म्हात्रे यांच्या माध्यमातून मंगळवार १२ मे रोजी तुर्भे हनुमान नगर येथील हनुमान मंदिरामध्ये भक्तिभावपूर्ण वातावरणात महाप्रसाद वाटप करण्यात आला. प्रारंभी, आमदार मंदा म्हात्रे यांच्या शुभहस्ते हनुमान आरती, पूजा - अर्चा विधिवत करून महाप्रसाद वाटप सुरू करण्यात आले . यावेळी भक्तांनी हनुमानाचे दर्शन घेत महाप्रसादाचा लाभ घेतला.



यावेळी बोलताना आमदार मंदा म्हात्रे यांनी बोलताना सांगितले की,धार्मिक परंपरा जपत समाजामध्ये एकोपा व सामाजिक बांधिलकी वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला हनुमान नगर परिसरातील सर्वधर्मीय नागरिक, हनुमान भक्त भाजप कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवत सोहळ्यात सहभाग घेतला. नागरिकांनी आमदार मंदा म्हात्रे यांच्या सामाजिक व धार्मिक कार्याचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे समाजामध्ये सकारात्मक वातावरण आणि ऊर्जा निर्माण होत असल्याची भावना व्यक्त केली.

यावेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत माजी नगरसेवक बाबासाहेब गायकवाड, मफतलाल चव्हाण, सुरेश गायकवाड, गुलाबराव भिडे, रामदीप हलवाई, भावेश पाटील, शशी भानुशाली, प्रवीण जाधव, भाजपा ज्येष्ठ कार्यकर्ता जनार्धन सुतार, भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष निकेतन पाटील, माजी तुर्भे मंडळ अध्यक्ष सुरेश अहिवळे, रामदीप हलवाई, सुरेश गायकवाड तसेच हनुमान नगर येथील असंख्य नागरिक उपस्थित होते.

# दापीवलीत ग्रीटच्या पिशव्यांवरून दोन गटांमध्ये हाणामारी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी परिसरातील दापीवली येथे घरासमोरील ग्रिटच्या पिशव्या बाजूला करण्याच्या कारणावरून दोन गटांत जोरदार वाद होऊन परस्पर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पहिल्या तक्रारीनुसार, महिला फिर्यादी घरात पाणी भरत असताना घरबांधकामासाठी ठेवलेल्या ग्रिटच्या पिशव्यांवरून आरोपींनी वाद घालत शिवीगाळ व धक्काबुक्की केली. फिर्यादीने मारहाण रोखण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने त्यांच्या नाकावर मारून दुखापत केली.

दुसऱ्या तक्रारीत, फिर्यादी आपल्या कुटुंबासह कार्यक्रमावरून घरी आल्यानंतर कार पार्क करत असताना पार्किंगमधील ग्रिटच्या पिशव्या बाजूला केल्याचा राग धरून आरोपींनी वाद घालत मारहाण केली. यामध्ये फिर्यादीच्या पत्नीला धक्का देऊन खाली पाडल्याने तिच्या पायाला दुखापत झाली. दोन्ही प्रकरणांमध्ये जमावबंदी आदेशाचे उल्लंघन झाल्याचेही नमूद करण्यात आले असून रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



# अरुण म्हात्रेंना महाराष्ट्र भूषण आदर्श कविरत्न पुरस्कार

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

युवा प्रबोधन साहित्य मंच ग्रामीण युवा बहुउद्देशीय संस्था व बंडखोर साप्ताहिक पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या युवा संकल्प महाराष्ट्र भूषण पुरस्कारात सुपरिचित कवी- अरुण द. म्हात्रे. जासई,यांची निवड 'महाराष्ट्र भूषण आदर्श कविरत्न' पुरस्कार- २०२६ करिता होऊन त्यांना सन्मानपूर्वक गौरविण्यात आले.



समाज प्रबोधनात्मक, जनहितकारी, पर्यावरण, स्वच्छता, पाऊस-पाणी, वृक्षवल्ली-वनचरी, पशुपक्षी-प्राणी-निसर्गप्रेम, शेतकरी, कामगार, जवान, पोलीस, डॉक्टर, व्यसनमुक्ती संदेश, प्रेम, विरह, देव-देवता, सणवार-उत्सव, संस्कृती, रूढी-परंपरा, आई-वडील, नातीगोती, बालपण, खेळ, मौज-मस्ती, काम-कष्ट-कर्तव्य, जीवन-मरण, वस्तू-उपयोग-काळजी, धरती- आकाश, सूर्य-चंद्र-तारे इत्यादी सर्व विषयांच्या काव्य-खजिन्यातून शब्द-मोती शोधून साध्या शब्दांत आशयघन रचना करणारे म्हणून कविश्री अरुण द. म्हात्रे यांची ओळख आहे. त्यांच्या भावस्पर्शी, हृदयस्पर्शी कवितांनी मन हळहळून जाते. म्हात्रेंचे काव्य-वाचन आणि काव्य-गायन उठावदार व लक्षवेधी असते. रचनांमध्ये शिकवण, प्रबोधन, मनोरंजन भरलेले असते.

अनेक वर्तमानपत्र, साप्ताहिक, मासिक, दिवाळी अंक तसेच राज्यस्तरीय प्रातिनिधिक कवितासंग्रहातून त्यांच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. म्हात्रेंना गायन-वादनही अवगत आहे. सर्व प्रकारची मराठी-हिंदी गाणी ते गातात. असे हे चतुरस्त्र, बहुगुणी कवी/गायक- अरुण द. म्हात्रे 'महाराष्ट्र भूषण आदर्श कविरत्न' पुरस्काराने सन्मानित झाल्याबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# पावणे गाव ग्रंथालयास स्पर्धा परीक्षेसाठी पुस्तक संच आणि १० लॅपटॉपची भेट

**नवी मुंबई : बातमीदार**

एकविसाव्या शतकातील आधुनिक नियोजनबध्द शहर म्हणून नवी मुंबई शहराची वेगळी ओळख आहे. ही ओळख दृढ करताना शहरातील वाचन संस्कृती आणि वैचारिक वारसा जपण्याच्या हेतूने नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध ठिकाणी ग्रंथालये उभारली जात आहेत.



या ग्रंथालयांमध्ये विविध उपक्रम राबविण्यात येत असतात. या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका पावणेगाव ग्रंथालयामध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. नगरसेवक शशिकांत भोईर यांच्या पुढाकारातून नोसिल इं.लिमी. चे राजेंद्र देसाई व सुमित यांच्या हस्ते ग्रंथालयास विविध स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त अशा १७ पुस्तकांचा संच देणगी स्वरूपात प्रदान करण्यात आला.

या पुस्तकांमध्ये एमपीएससी, यूपीएससी तसेच इतर विविध स्पर्धात्मक परीक्षांसाठी आवश्यक असलेल्या दर्जेदार साहित्याचा समावेश आहे. त्याचप्रमाणे ग्रंथालयासाठी १ बॅग रॅक व १ चप्पल / बूट रॅकही भेट स्वरूपात देण्यात आले.

याशिवाय ग्रंथालयात अभ्यासासाठी येणा-या विद्यार्थ्यांना आधुनिक सुविधांचा लाभ मिळावा याकरिता १० लॅपटॉप देखील उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या लॅपटॉपचा उपयोग विद्यार्थ्यांना ग्रंथालयात बसून अभ्यासासाठी होईल. या उपक्रमामुळे स्थानिक विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी मदत होणार असून त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होण्यास हातभार लागणार आहे.

यावेळी नमुंमपा ग्रंथपाल श्रीम. अर्चना नगराळे, सहा ग्रंथपाल श्रीम. शर्मिली दिघे उपस्थित होत्या. भविष्यातही अशा प्रकारच्या शैक्षणिक उपक्रमांना प्रोत्साहन देण्याचे मान्यवर अतिथींनी सूचित केले.

# ऐरोलीत अनधिकृत बांधकामविरोधी कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.



नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली कार्यालया अंतर्गत भु.क्र.९५/९७, शिवकॉलनी, गल्ली नं- ५, से-१, ऐरोली, नवी मुंबई येथे संतोष प्रसाद यांनी बांधकाम परवानगी व्यतिरिक्त अनधिकृतपणे बांधकाम सुरु केले होते.

संतोष सुखदेव प्रसाद, शिवकॉलनी, गल्ली नं ५, से१, ऐरोली, नवी मुंबई यांनी केलेल्या अनधिकृत बांधकामांस जी नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वतःहून हटविने आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते.

सदरचे अनधिकृत बांधकाम साधना पाटील, सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी ऐरोली, यांचे नियंत्रणाखाली तोडक मोहिमेचे आयोजन करुन सदर अनधिकृत बांधकाम अंशतः निष्कासित करण्यात आले. यापुढे देखील अशा प्रकारे अतिक्रमण विरोधी कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.


# मतदार याद्या सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाला सहकार्य करण्याचे नागरिकांना आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतीय लोकशाही प्रक्रियेचा कणा असलेल्या मतदार याद्या अधिक अचूक, अद्ययावत व पारदर्शक करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाच्या वतीने मतदार याद्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. यापूर्वी सन २००२ मध्ये विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम झाला होता. सद्यस्थितीत लोकसभा व विधानसभा निवडणूकीमध्ये सन २०२४ ची मतदार यादी तयार करण्यात आली आहे. या २०२४च्या मतदार यादीतील मतदारांचे सन २००२मधील अंतिम मतदार यादीतील मतदारांशी ताळमेळ घालण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोकलिंगम यांनी नवी मुंबई महापालिका मुख्यालयास भेट देत आयुक्त डॉ. कैलास शिंदे व संबंधित अधिकारी यांचेकडून मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत सुरु असलेल्या कामाचा सविस्तर आढावा घेतला आणि कामाला गती देण्याचे निर्देशित केले.

त्यानुसार अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी, १५० ऐरोली विधानसभा मतदार संघाच्या मतदार नोंदणी अधिकारी प्रिती पाटील व १५१ बेलापूर विधानसभा मतदार संघ मतदार नोंदणीअधिकारी अश्विनी पाटील यांच्यासमवेत सर्व विभाग अधिकारी तथा सहा.मतदार नोंदणी अधिकारी यांची विशेष बैठक घेतली. यावेळी निवडणूक विभागाचे उपआयुक्त भागवत डोईफोडे, शिक्षण विभागाच्या उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे, वैदयकिय आरोग्य अधिकारी डॉ. राजेश म्हात्रे उपस्थित होते.



सदर काम जलद गतीने व विहित वेळेत अचूक पूर्ण करण्याची जबाबदारी सर्व बीएलओ यांची असून यामध्ये महानगरपालिकेसह विविध शासकीय, निमशासकीय कार्यालयांमधील कर्मचारी, शिक्षक, आशा वर्कर यांचा समावेश आहे. यामध्ये नियुक्त केलेले काही बीएलओ कामचुकारपणा करीत असल्याचे तसेच काही कर्मचा-यांना बीएलओची नियुक्तीपत्रे बजावूनही ते आपल्या कर्तव्यावर हजर होत नसल्याचेही निदर्शनास आले आहे. अशा कर्तव्याशी प्रतारणा करणा-या कर्मचा-यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी असे निर्देश यावेळी देण्यात आले.

बीएलओ यांना त्यांच्या मतदान केंद्र कार्यक्षेत्रातील मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी व त्यांच्यामार्फत योग्य माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी स्थानिक पातळीवर नगरसेवक व राजकीय पक्षांचे पदाधिकारी यांचे सहकार्य अपेक्षित आहे. नगरसेवक व पक्ष पदाधिकारी यांनी त्यांच्या पक्षाने नेमलेले बीएलए यांना निवडणूक विषयक काम करणारे बीएलओ यांच्या मदतीला दिल्यास हे राष्ट्रीय काम योग्य रितीने गतीमानतेने पूर्ण होईल हे लक्षात घेऊन नगरसेवक व पक्ष पदाधिकारी यांना याकामी संपूर्ण सहयोग करण्याचे आवाहन करण्याचे सूचित करण्यात आले.

मतदार याद्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत सध्या अस्तित्वात असलेल्या मतदार यादीतील अस्पष्ट, आकार विरहित व अमानवी छायाचित्रांशी पडताळणी करणे तसेच तर्कहीन चुका व अनाकलनीय नोंदींची वगळणी करणे, डेमोग्राफीकल सिमीलर इन्ट्रीजची पडताळणी करणे व वगळणी करणे अशी कामे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी अर्थात बिएलओ यांच्यामार्फत करण्यात येत आहेत.

सदर मतदार याद्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम हा विश्वासार्ह, स्वच्छ व पारदर्शक निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी अत्यंत महत्वाचा असून या उपक्रमात नागरिकांनी स्वतःहून सहभागी होणे महत्वाचे आहेत. एकही पात्र मतदार हा मतदानापासून वंचित राहू नये व एकही अपात्र नाव मतदार यादीत असू नये हा या मोहीमेचा मुख्य उद्देश असून नागरिकांनी कोणतीही भिती न बाळगता स्वतः पुढाकार घेऊन मतदार यादीत आपले नाव तपासणे लोकशाहीच्या सबलीकरणासाठी महत्वाचे आहे.

या अंतर्गत नागरिकांनी स्वतःचे नाव २००२ च्या मतदार यादीत असल्याची खातरजमा करुन घेणे महत्वाचे आहे. त्या मतदार यादीत नाव नसेल अशा कमी वयाच्या नागरिकांनी आपले आई - वडील, वडीलांकडील आजी-आजोबा यांचे नाव सन २००२ च्या मतदार यादीत असल्याबाबतची खातरजमा प्रोजिनी पडताळणीव्दारे करुन घ्यावयाची आहे आणि ही माहिती बीएलओ ॲपमध्ये ऑनलाईन मॅपिंग करण्यासाठी आपल्या विभागातील बीएलओ यांना उपलब्ध करुन द्यावयाची आहे.

यापुढील काळात लवकरच मतदार यादीत नावे न आढळलेल्या मतदारांची नावे वगळण्याची कार्यवाही सुरु होणार असल्याने प्रत्येक मतदाराने सन २००२ च्या यादीशी आपले नाव मॅपिंग करुन घेणे महत्वाचे आहे. सदर पडताळणी न झाल्यास व मतदार यादीतून नाव वगळण्यात आल्यास पुन्हा नाव समाविष्ट करण्यासाठी नव्याने नोंदणी प्रक्रिया पार पाडावी लागेल याचीही नोंद नागरिकांनी घ्यावी व आपल्या नावाचे मॅपिंग करुन घ्यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

तरी यादवारे १५० ऐरोली विधानसभा व १५१ बेलापूर विधानसभा मतदार संघातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी आपले नाव बीएलओ मॅपिंग ॲपमध्ये मॅपिंग झाले असल्याची खातरजमा करुन घ्यावी व आपल्या घरी येणा-या बीएलओ यांना संपूर्ण व सत्य माहिती देऊन सहकार्य करावे.

# रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जलमार्गाने जोडणार

## राज्याचे बंदर व मत्स्यविकासमंत्री नितेश राणे यांचे प्रतिपादन

**मुरुड : प्रतिनिधी**

जंजिरा किल्ला हा राज्याच्या पर्यटनदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा वारसा असून पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आणि सुविधा वाढीसाठी जंजिरा किल्ला परिसरात उभारण्यात येणारा ब्रेकवॉटर भिंत व प्रवासी जेटी प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे प्रतिपादन मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री नितेश राणे यांनी बुधवारी येथे केले.

मुरुड तालुक्यातील ऐतिहासिक जंजिरा किल्ला येथे महाराष्ट्र सागरी मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या 'जंजिरा किल्ला ब्रेकवॉटर व प्रवासी जेटी बांधकाम' प्रकल्पाच्या लोकार्पण सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमाप्रसंगी खासदार सुनील तटकरे अध्यक्षस्थानी होते. तसेच मुरुड-जंजिरा नगराध्यक्षा आराधना दांडेकर, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी., मत्स्यव्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, तहसिलदार आदेश डफळ यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री श्री.राणे म्हणाले की, सुमारे तीन किलोमीटर परिसरात लाटरोधक भिंत उभारण्यात येत असून या माध्यमातून पर्यटकांना सुरक्षित व सुलभ प्रवास सुविधा उपलब्ध होणार आहे. महाराष्ट्र सागरी मंडळामार्फत हा प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. मत्स्यव्यवसाय आणि पर्यटन या दोन्ही क्षेत्रांच्या विकासासाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरणार असून जंजिरा परिसरात सी-वॉक, रिसॉर्ट, वॉटर मेट्रो, रेस्टॉरंट तसेच विविध पर्यटन सुविधा विकसित करण्यासाठी शासनस्तरावर नियोजन करण्यात येत आहे.





### ▪ जंजिरा येथील प्रवासी जेट्टीचे उद्घाटन

स्थानिक युवकांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होऊन परिसरातील पर्यटन व्यवसायाला मोठी चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करताना श्री. राणे यांनी सांगितले की, मुंबईच्या वॉटर मेट्रोच्या धर्तीवर रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हे तिन्ही जिल्हे जलवाहतुकीच्या माध्यमातून जोडण्याचे नियोजन करण्यात येत आहे. यामुळे देशांतर्गत पर्यटन व व्यापाराला चालना मिळणार आहे. महाराष्ट्र सागरी मंडळ आणि पर्यटन विभाग हे परस्परपूरक विभाग असून पर्यटन क्षेत्रातील व्यावसायिकांना आवश्यक पायाभूत सुविधांसाठी शासन सर्वतोपरी सहकार्य करेल.

पर्यटकांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी स्थानिक व्यावसायिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

मच्छीमार बांधवांनी आपल्या बोटी इलेक्ट्रिक तंत्रज्ञानावर आधारित करण्याचा विचार करावा, जेणेकरून भविष्यातील पेट्रोल-डिझेल संकटाला सामोरे जाणे सुलभ होईल. इलेक्ट्रिक बोटींसाठी मत्स्यव्यावसायिकांना शासनाकडून आवश्यक ती मदत करण्यात येईल,अशी ग्वाही देखील श्री.राणे यांनी यावेळी दिली.

खासदार सुनील तटकरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, या प्रकल्पामुळे जंजिरा किल्ल्यावर येणाऱ्या पर्यटकांना भरती-ओहोटीच्या काळातही सुरक्षित चढ-उतार सुविधा उपलब्ध होणार असून पर्यटन व्यवसायाला चालना मिळण्यास मदत होणार आहे. तसेच मत्स्यव्यवसायासाठी आधुनिक सुविधा विकसित करण्यात येत असून मासळी लिलाव गृह, जाळी वाळविण्याचे शेड, विश्रामगृह, रेडिओ कम्युनिकेशन सेंटर तसेच स्वच्छतागृह सुविधांचाही प्रकल्पात समावेश करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सागरमाला योजनेंतर्गत राज्य हिस्सा निधीतून राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पासाठी सुमारे रु.१११.४१ कोटींची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. राज्य पर्यावरण परिणाम मूल्यांकन प्राधिकरण (SEIAA) यांच्याकडून प्रकल्पास पर्यावरणीय मंजुरी प्राप्त झाली असून सुमारे २५० मीटर लाटरोधक भिंतीचे बांधकाम प्रस्तावित आहे. पाईल जेटी व अल्युमिनियम गँग-वे उभारणीचे काम मे. डी.डी.पी. फॉरकॉन (JV) यांना देण्यात आले असून प्रकल्पावर आतापर्यंत सुमारे रु. १०७ कोटी खर्च करण्यात आला आहे.

## बोरघाटात मिनीबस उलटून आठ जण जखमी, दोघे गंभीर



**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरील एच ओ सी ब्रिज जवळ बोरघाटातील मंकी हिल बॅटरी पॉईंट जवळ मिनी बस चा ब्रेक फेल झाल्याने चालकाचे नियंत्रण सुटल्याने मिनी बस क्रमांक MH.०६. BW.४०३० चालक. भरत रमेश शेळके याचे नियंत्रण सुटल्याने मिनीबस रस्त्यावर पलटी झाली. मिनीबस ही मुरबाड तालुक्यातील शेळकेपाडा येथून जेजुरीकडे निघाली होती. अपघातामध्ये बसमधील ८ प्रवासी जखमी झाले. जखमींमध्ये कमलाबाई रामचंद्र माळी ६५ , गुरुनाथ डोंगरे,५५ बाळाराम भोईर ५६ , रवींद्र राम माळी ४९ , गुलाबबाई दत्तू हुमणे ७१ , अशोक जयराम डोंगरे,५० कस्तुरी गणेश माळी १४ आणि मीनाबाई गुरुनाथ डोंगरे ५१ यांचा समावेश आहे. सर्व जखमी हे मुरबाड तालुक्यातील शेळकेपाडा येथील रहिवासी आहेत.गंभीर जखमी मधे १ महीला व पुरुषाचा समावेश आहे

अपघाताची माहिती मिळताच महामार्ग वाहतूक पोलीस बोरघाट विभाग, आयआरबी पेट्रोलिंग, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बल, लोकमान्य हॉस्पिटल ॲम्बुलन्स, स्वामिनी ॲम्बुलन्स तसेच हेल्प फाउंडेशनची टीम घटनास्थळी दाखल झाली. सर्व यंत्रणांनी तातडीने मदतकार्य राबवत जखमींना खोपोली नगरपालिकेच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल केले . बस अपघातातील जखमींवर प्रथम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर खोपोली नगरपालिका रुग्णालय येथे प्राथमिक उपचार करण्यात आले असून पुढील उपचारासाठी एमजीएम हॉस्पिटल, पनवेल येथे दाखल करण्यात आले आहे. ही घटना सकाळी ८ वा सुमारास घडली.

हा अपघात खोपोली पोलीस स्टेशन हद्दीत घडला असून पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली.

## नागोठणे उपसरपंचपदी ज्ञानेश्वर साळुंखे यांची बिनविरोध निवड

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे ग्रामपंचायतीचे विद्यमान उपसरपंच अकलाख पानसरे यांना जनसेवा विकास आघाडीचे नेते किशोरभाई जैन यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वानुमते दोन वर्षांची मुदत देण्यात आली होती. मुदत पूर्ण झाल्यानंतर अकलाख पानसरे यांनी मागील महिन्यात उपसरपंच पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या पदासाठी मंगळवार दि. १२ मे रोजी नागोठणे ग्रामपंचायत कार्यालयात निवडणूक पार पडली.

सरपंच सुप्रिया महाडिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या निवडणुकीत सदस्य ॲड. प्रकाश कांबळे आणि ज्ञानेश्वर साळुंखे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. मात्र जनसेवा विकास आघाडीचे नेते किशोरभाई जैन यांच्या निर्णयाचे स्वागत करत ॲड. प्रकाश कांबळे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला.

यामुळे वार्ड क्रमांक ६ चे सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे यांची नागोठणे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याचे सरपंच सुप्रिया महाडिक यांनी जाहीर केले.

ज्ञानेश्वर साळुंखे यांच्या निवडीची घोषणा होताच त्यांच्या समर्थकांनी फटाक्यांची आतिषबाजी करत जल्लोष साजरा केला.उपसरपंच निवडणुकीच्या प्रसंगी नागोठणे सरपंच सुप्रिया महाडिक, ज्येष्ठ नेते संजय महाडिक, पहिले लोकनियुक्त सरपंच तथा विद्यमान सदस्य डॉ. मिलिंद धात्रक, ग्रामपंचायत अधिकारी राकेश टेमघरे, मावळते उपसरपंच अकलाख पानसरे, नवनिर्वाचित उपसरपंच ज्ञानेश्वर साळुंखे , सदस्य संतोष नागोठणेकर, सचिन ठोंबरे, ॲड. प्रकाश कांबळे, शबाना मुल्ला, पूनम काळे, सुप्रिया काकडे, भाविका गिजे, अमृता महाडिक, ज्योती राऊत, सुलताना लंबाते, जन्नत कुरेशी, विनिता पाटील, शहानाज अधिकारी, मंगी कातकारी, संजय काकडे, भरत गिजे, अनिल महाडिक, माजी उपसरपंच सुनील लाड, बंटी मांडे, अजित दळवी, बबलू खांडागळे, रुपेश नागोठणेकर, अल्वीन नाकते यांच्यासह जनसेवा विकास आघाडीचे कार्यकर्ते व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.



## मुरूड समुद्रकिनारा व परिसर केला चकाचक!



**मुरुड : प्रतिनिधी**

स्वच्छेते मोहिमेत प्रत्येक नागरिकांनी भाग घेऊन स्वच्छेतेचे महत्व जाणले पाहिजे स्वच्छता ही निरंतर चालणारी प्रक्रिया असुन त्यामध्ये सातत्य असणे आजच्या काळाची गरज आहे.या स्वच्छेतेमुळे पर्यटकांची संख्येत वाढ होईल, रोगराई नष्ट होईल तरी रस्तावर कचरा टाकु नका, स्वच्छ मुरूड सुंदर मुरुड बनुया आमदार महेंद्रशेठ दळवी यांचे स्वप्न पूर्ण करुया असे आवाहन मुरूड जंजिरा नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांनी आमदार महेंद्रशेठ दळवी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून महास्वच्छता अभियाना कार्यक्रमा वेळी बोलत होते.

या महास्वचछता अभियानासाठी महिला शिवसेना जिल्हाप्रमुख तृप्ती पाटील, उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत,मुरुड शहर प्रमुख दर्शन काळबेरे,मुरूड तालुका लॉजीग हॉटेलस असोसिएशन तथा नगरसेवक विजय पाटील,पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर, नगरसेवक पांडुरंग आरेकर, नगरसेवक रुपेश रणदिवे, नगरसेविका नगमाना खानजादे, नगरपरिषद विरोधीपक्ष नेते अंकिता गुरव, नगरसेविका सुगंधा मकु, नगरसेवकनितिन आबुर्ले, नगरसेवक श्रीकांत खोत,ओम पाटील,युगा ठाकुर, योगेश ठाकुर, ऑटरस्पोर्टस ब्रीज फोटोग्राफर अध्यक्ष सागर चौलकर,पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळ, मुरूड तालुका लॉजीग हॉटेलस असोसिएशन चे पदाधिकारी, व नागरिक व एकदरा शिंदे शिवसेना पक्षांचे कार्यकर्ते समुद्र किनारा व परिसर स्वच्छ करण्यासाठी सहभाग नोंदविला.

या स्वच्छता अभियानामुळे दोन टन कचरा गोळा करण्यात आला.यावेळी समुद्र किनाऱ्यावरील प्लास्टिक बॉटल,पिशव्या,नारळाची झापे ,काच बॉटल आदी स्वरूपाचा कचरा गोळा करण्यात आला.



अलिबाग : तालुक्यातील चाळमाळा बंदर थळ समुद्र किनारी आमदार महेंद्र दळवी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भव्य घोडागाडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. (छाया : जितू शिगवण)

## स्थलांतरित पक्ष्यांचे संवर्धन करणे आवश्यक



पूर्व आशियाई देशांतील थायलंड येथे आम्ही ऑक्टोबर महिन्यात २०२२ साली उघडचोची करकोचे ( ओपन बिल्ड स्टॉर्क्स ) यांचे स्थलांतर आणि विणीच्या हंगामातील घरटे असलेले सारंगागार पहायला बँकॉक शहराच्या उत्तरपूर्व भागात खास संरक्षित राखीव क्षेत्रात फिरलो. इथे इतर सुद्धा पक्षी फार मोठ्या प्रमाणावर प्रजनन, घरटी करण्यासाठी स्थलांतरीत झाले होते. या वर्षी इतकी संख्या वाढ होती की आम्ही खाओ दिनसर या दक्षिण प्रदेश शिकारी पक्षी अभ्यासासाठी गेलो असता तेथील अनेकांनी हे सुचवलं की ईस्टर्न वेटलॅन्ड रिझर्व मध्ये तुम्ही नक्की स्टॉर्क्स आयबिसेस बघायला जायला हवं.

इथे पोहचल्यावर सगळा कॅनव्हास बदलला. आजूबाजूला इमारती, शहराच्या थोड लांब अशी जागा पाणथळ पक्षांसाठी खास राखीव होती.. का...? तर इथे पाहुणे येतात आणि आपले घरटे तयार करतात व त्यामधील पिल्ले मोठी होऊन सुरक्षित उडून जावे यासाठी यशस्वी आयोजन करणे ही आपली जबाबदारी असल्याचे मत इथल्या प्रत्येकाचे आहे. शिवाय शहराच्या टाऊनशिप आराखड्यात तसे नियोजन अधोरेखित केले गेले असून त्याची अंमलबजावणी देखील करण्यात येते हि बाब मला विशेष भावली. अगदी रस्त्या मधोमध असलेले झाड ( सारंगागार) हे देखील जोपासले गेल होते. क्लायमेट इम्पॅक्ट मुळे यंदा घरटी जास्त झाल्याचे इथले पक्षी अभ्यासक सांगत होते. मी सारा आणि काव्या यांना या संवर्धन नियोजन पद्धतीचे प्रयत्न विशेष समजून सांगितले. याचे कारण पहिले म्हणजे शेती.

शेतात खूप जास्त प्रमाणात गोगलगाय अशासारखे शिंपले, खूबे वाढले तर त्यांच्या लाळेसारख्या चिकट पदार्थामुळे रोपांच्या खोडावर, पानावर बुरशीजन्य रोगाची लागण होते. आणि नेमके या गोगलगायी मुग्ध बलाक करकोचांचे खाद्य असल्यामुळे ईथे त्यांच्या संख्येवर नियंत्रण राखले जाते. बगळे , करकोचे हे शेतकऱ्याचे खरे मित्र. रायगड जिल्ह्यात विणीच्या काळात मे ते ऑक्टोबर या कालावधीत शेकडो आशियाई उघडचोची करकोचे (Asian Openbill Storks) पावसाच्या हंगामात विणीसाठी स्थलांतर करतात. जलीय गोगलगायींच्या शोधात पुन्हा महाड,अलिबाग, माणगाव येथे आता ते स्थिरावलेले आहेत. प्रजनन क्षेत्रात दुर्मिळ होत जाणारी झाडे आणि शिवाय वन्यजीव अधिवास विचारत न घेता करण्यात येणारी वृक्षतोड या बलाक प्रजेला चिंताजनक ठरली आहे. यंदा पाण्याची पातळी पूर्वीपेक्षा खूपच कमी झाली असून आपण भीषण पाणी टंचाईला सामोरे जात आहोत.

कोरडे हवामान आणि पाणथळ जागी इतर काळ व्यस्त असणारे करकोचे पावसाळ्यात हमखास कोकणात स्थलांतरीत होताना दिसतात. यंदा ही टोळी जरा लवकरच आली. साधारण २२मार्च रोजी पहिली ३०ते ३५पक्षी चवदार तळ्याच्या आबाच्या झाडावर विसावताना नोंदविले गेले. अंतर्गत पाणथळ जागा, गोड्या खाऱ्या पाण्याची सरोवरे, शेतजमिनीतील सिंचन प्रदेश, अशी पूरक ठिकाणे निश्चित करून या पक्षांचे स्थलांतर होत असल्याचे दिसून येते. महाड येथील चवदार तळे परिसर जुनी मंडई, डोंगरी वाडा आणि सरेकर अळी परिसरात यांची वीण सर्वात जास्त संखेने होती. २८४ घरटी नोंद पूर्वी केली गेली आहे. पण गेल्या आठ वर्षांपासून बांधकाम आणि विद्युत तारा वर येणाऱ्या झाडांच्या फांद्यांची तोड या आणि इतर कारणांमुळे काही ठिकाणी समूळ वृक्षतोड तर अगदी मधले खोड बाकी ठेऊन मोकळ्या केलेल्या साऱ्या फांद्या या मुळे या पक्षांचे स्थलांतर खूपच कमी होताना दिसत आहे. शिवाय त्यांच्या विष्टा आणि पिल्लांच्या खाली पडण्यामुळे निर्माण होणारी दुर्गंधी या व अशा इतर कारणांमुळे त्यांची घरटी ऐन पावसात काढली जातात . ही बाब खेद जनक आहे. खरतर हा वन्यजीव कायद्यांनुसार गुन्हा देखील आहे. वन्यजीव कायद्यांनुसार त्यावर कारवाई करणे क्रमप्राप्त ठरते.

यंदा अवघी ७८घरटी चवदार तळे विभागात होत असून हे प्रमाण २८ क्के इतके चिंताजनक झाले आहे. सिस्केप संस्था महाड आणि वनविभाग वनपरिक्षेत्र महाड यांच्या संयुक्त विद्यमाने यंदा बगळे आणि करकोचे यांचे घरट्याचे संवर्धन करण्यासाठी विविध प्रयत्न नियोजित आहेत. यासाठी स्थानिक आणि नगरपालिका प्रशासन यांनी सहभाग घेऊन या स्थलांतरीत पक्षांचे संरक्षण करणे गरजेचे आहे. चला तर जागतिक पक्षी स्थलांतर दिवसाचे अवचित्य साधून येणाऱ्या या पाहुण्यांचे स्वागत करूया आणि त्यांचे संरक्षण करूया.

**-प्रेमसागर मेस्त्री**
**रायगड जिल्हा मानद वन्यजीव रक्षक,**
**अध्यक्ष, सिस्केप संस्था, महाड**

# गुजरात टायटन्सचा विक्रमी विजय

## सनरायझर्स हैदराबादला गुंडाळत घेतली अव्वलस्थानी झेप

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरात टायटन्सच्या संघाने तगडी फलंदाजी असलेल्या सनरायझर्स हैदराबादच्या संघाला शंभरीच्या आत गुंडाळत दिमाखदार विजय नोंदवला. यंदाच्या हंगामातील आठव्या विजयासह १६ गुणांची कमाई करत शुबमन गिलच्या संघाने प्लेऑफ्समधील स्थान निश्चित करताना पहिली क्वॉलिफायर खेळण्याची दावेदारीही भक्कम केली आहे.

साई सुदर्शन ६१ (४४) आणि वॉशिंग्टन सुंदरच्या ५० (३३) अर्धशतकाच्या जोरावर गुजरातच्या संघान निर्धारित २० षटकात ५ बाद १६८ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना सनरायझर्स हैदराबादचा संघ ८६ धावांत आटोपला आणि गुजरात टायटन्सच्या संघाने ८२ धावांनी सामना जिंकला. गुजरातचा आयपीएलमधील हा सर्वात मोठा विजय ठरला.



संघ अडचणीत असताना साई सुदर्शनने वॉशिंग्टन सुंदरच्या साथीने चौथ्या विकेटसाठी ४१ चेंडूत ६० धावांची भागीदारी रचली. साईने ४४ चेंडूत पाच चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ६१ धावांची खेळी केली. याशिवाय वॉशिंग्टनने आपल्या आयपीएल कारकिर्दीतील दुसरे अर्धशतक झळकावले. त्याने ३३ चेंडूत सात चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ५० धावा केल्या. या दोघांच्या खेळीच्या जोरावर गुजरातच्या संघाने निर्धारित २० षटकात ५ बाद १६८ धावा केल्या होत्या. सनरायझर्सच्या संघाकडून गोलंदाजीत प्रफुल हिंगे आणि साकीब हुसेन यांनी प्रत्येकी दोन, तर पॅट कमिन्सने एक विकेट घेतली.

गुजरात टायटन्सच्या संघाने दिलेल्या धावांचा पाठलाग सनरायझर्स हैदराबादने पहिल्या षटकापासून विकेटचा सिलसिला पहायला मिळाला. मोहम्मद सिराजने ट्रॅविस हेडला खातेही न उघडता माघारी धाडले. दुसऱ्या षटकात अभिषेक शर्मा एक षटकार मारून रबाडाच्या गोलंदाजीवर फसला. ठराविक अंतराने सनरायझर्स हेदराबादच्या संघाने विकेट गमावल्या. कर्णधार पॅट कमिन्सने नऊ चेंडूत केलेली १९ धावांची खेळी ही हैदराबादकडून कोणत्याही फलंदाजाने केलेली सर्वोच्च खेळी ठरली. गुजरातकडून कगिसो रबाडा आणि जेसन होल्डर यांनी प्रत्येकी तीन विकेट्स आपल्या खात्यात जमा केल्या. प्रसिद्ध कृष्णाने दोन, तर सिराज आणि राशिद खान याने एक विकेट घेत हैदराबादचा डाव १४.५ षटकांत ८६ धावांवरच आटोपला.

# साई सुदर्शनने हार्दिक पांड्याला मागे टाकत गिलच्या विक्रमाशी केली बरोबरी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्यात गुजरात टायटन्सचा सलामीवीर साई सुदर्शन याने सलग तिसऱ्या अर्धशतकासह खास विक्रमी डाव साधला. हार्दिक पांड्याचा विक्रम मोडीत काढत त्याने कर्णधार शुबमन गिलच्या खास विक्रमाशी बरोबरी केली आहे.

गुजरात टायटन्सच्या संघाकडून साई सुदर्शन याने दुसऱ्यांदा सलग तीन अर्धशतके झळकावण्याचा पराक्रम केला आहे. गिलनेही दोन वेळा अशी कामगिरी केली असून हार्दिक पांड्याने २०२२च्या हंगामात एकदा अशी कामगिरी केली होती.

हार्दिक पांड्याने २०२२च्या हंगामात गुजरात टायटन्सचे नेतृत्व करताना सलग तीन



अर्धशतके झळावली होती. या हंगामात त्याने संघाला पदार्पणात जेतेपदही मिळवून दिले होते. त्यानंतर साई सुदर्शन याने २०२४-२५च्या हंगामात सलग तीन अर्धशतके झळावत हार्दिक पांड्याची बरोबरी केली. आता यंदाच्या हंगामातील सलग तिसऱ्या अर्धशतकासह पांड्याला मागे टाकत साईने कर्णधार शुबमन गिलच्या विक्रमाशी बरोबरीचा डाव साधला. गिलने गत हंगामासह यंदाच्या हंगामात सलग तीन अर्धशतके झळकावल्याचा रेकॉर्ड आहे.

**५०० धावांचा आकडाही गाठला**

साई सुदर्शनने सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्यात संघ अडचणीत असताना ४४ चेंडूत पाच चौकार आणि दोन अर्धशतकासह ६१ धावांची खेळी केली. यासह तो यंदाच्या हंगामात ५०० धावांचा आकडा गाठणारा पहिला फलंदाज ठरला. १२ सामन्यातील १२ डावात त्याने ५०१ धावा करत ऑरेंज कॅपच्या शर्यतीत आपली दावेदारी भक्कम केली. २४व्या वर्षी हंगामात तीन वेळा पाचशेपेक्षा अधिक धावा करणारा साई आयपीएल इतिहासातील पहिलाच खेळाडू ठरला. याआधी कोहली व जैस्वाल यांनी २५ वर्षांचे होण्यापूर्वी प्रत्येकी दोन वेळा अशी कामगिरी केली होती.

# पॉवर प्लेमध्ये विदर्भकर प्रफुल हिंगेची हवा

**मुंबई : प्रतिनिधी**

अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर घरच्या मैदानात खेळणाऱ्या गुजरात टायटन्सच्या संघाविरुद्धच्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादच्या ताफ्यातून विदर्भकर प्रफुल हिंगे याने पॉवर प्लेमध्ये हवा केली. गुजरातच्या डावातील तिसऱ्या आणि आपल्या पहिल्या षटकात त्याने शुबमन गिलच्या रुपात पहिले यश मिळवले. त्यानंतर सहाव्या षटकात प्रफुलने त्याची जागा घेण्यासाठी आलेल्या जोस बटलरलाही तंबूचा रस्ता दाखवला. विदर्भकरासमोर गुजरातच्या ताफ्यातील दोन्ही स्टार बॅटर्सला दुहेरी आकडाही गाठता आला नाही.

सनरायझर्स हैदराबादचा कर्णधार पॅट कमिन्स याने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. गिलने साई सुदर्शनच्या साथीने गुजरात टायटन्सच्या डावाची सुरुवात केली. पण अनकॅप्ड प्रफुल हिंगेने आपल्या

## सात चेंडूंत दोन विकेट्स!



पहिल्याच षटकातील दुसऱ्या चेंडूवर टीम इंडियाच्या प्रिन्सला अवघ्या पाच धावांवर क्लासेनकरवी झेलबाद केले.

दरम्यान, गिल स्वस्तात माघारी फिरल्यावर गुजरात टायटन्स संघाची मदार ही जोस बटलरच्या खांद्यावर होती, पण पॉवर प्लेमधील अखेरच्या षटकातील पहिल्याच चेंडूवर प्रफुल हिंगेने त्याचाही करेक्ट कार्यक्रम केला. ही विकेट त्याने आत्मविश्वासाच्या जोरावर मिळवली.

**पदार्पणाच्या हंगामात लक्षवेधी कामगिरी**

प्रफुल हिंगे याने आपल्या दुसऱ्या षटकात खर्च केलेल्या २ चौकारांसह पहिल्या दोन षटकात फक्त १० धावा खर्च करीत पॉवर प्लेमध्ये दोन विकेट्स घेत संघाला दमदार सुरुवात करून दिली. पदार्पणाच्या सामन्यातच ३४ धावा खर्च करून चार विकेट्सचा डाव साधत इतिहास रचणाऱ्या प्रफुलने यंदाच्या हंगामातील पहिल्या चार सामन्यात आठ बहुमूल्य विकेट्स आपल्या खात्यात जमा केल्या होत्या. यानंतर गुजरातविरुद्ध पाचव्या सामन्यात संधी मिळताच त्याने पुन्हा एकदा आपल्या गोलंदाजीतील धार दाखवून देताना पहिल्या दोन षटकांतील स्पेलमध्ये दोन विकेट्स घेत १० विकेट्सचा आकडा गाठला.

## दिल्ली कॅपिटल्सचा माधव तिवारी चमकला

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या यंदाच्या हंगामात स्पर्धेतून बाहेर पडण्याची टांगती तलवार असलेला दिल्ली कॅपिटल्सचा संघ हिमाचल प्रदेश क्रिकेट असोसिएशनच्या धरमशालाच्या मैदानात पाच बदलासह मैदानात उतरला. पंजाबविरुद्ध माधव तिवारी या मध्य प्रदेशच्या अष्टपैलू खेळाडूला यंदाच्या हंगामात पहिली संधी मिळाली आणि त्याने या संधीचे सोने केले.

माधव तिवारी याचा जन्म २८ सप्टेंबर २००३ रोजी मध्य प्रदेशातील मौगंज या छोट्याशा गावात झाला. इतर अनेक युवा क्रिकेटपटूंप्रमाणे त्याला अद्याप मोठ्या स्तरावरील देशांतर्गत क्रिकेटचा अनुभव नाही. त्याने आतापर्यंत फक्त दोन आयपीएल सामने खेळले आहेत.

गत हंगामातच त्याने मुंबई इंडियन्सविरुद्ध पदार्पणाचा सामना खेळला, पण या सामन्यात त्याने एकही षटक टाकले नव्हते. आयपीएलच्या दुसऱ्या सामन्यात चेंडू हाती मिळताच त्याने आपल्या गोलंदाजीतील धमक दाखवली.

# बॉल टेम्परिंगच्या वादात अडकला पाकिस्तानचा शाहीन आफ्रिदी

**मीरपूर : वृत्तसंस्था**

पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यातील कसोटी मालिकेतील चौथ्या सामन्यादरम्यान पाकिस्तानचा स्टार वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदी एका नव्या वादात सापडला. सोशल मीडियावर शाहीनचा एक व्हिडीओ वेगाने व्हायरल होत असून त्यात तो चेंडूशी छेडछाड (बॉल टेम्परिंग) करताना दिसून येत आहे. या प्रकारामुळे क्रिकेट वर्तुळात उलटसुलट चर्चांना उधाण आले असून शाहीनवर टीकेची झोड उठत आहे.

कसोटी सामन्याच्या चौथ्या दिवशी बांगलादेशचा संघ दुसऱ्या डावात फलंदाजी करत असताना ही घटना घडली. व्हायरल झालेल्या व्हिडीओमध्ये शाहीन आफ्रिदी चेंडू आपल्या बुटांखाली दाबताना स्पष्टपणे दिसत आहे. शाहीनच्या बुटांच्या स्पाइक्समुळे चेंडूचा आकार बिघडू शकतो किंवा तो एका बाजूने खरखरीत होऊ शकतो, असा दावा केला जात आहे. विकेट



मिळवण्यासाठी शाहीनने जाणीवपूर्वक चेंडूशी छेडछाड केल्याचा आरोप नेटकऱ्यांकडून केला जात आहे.

हे निदर्शनास येताच पंचांनी तत्काळ हस्तक्षेप केला. पंचांनी शाहीनकडून चेंडू ताब्यात घेऊन बारकाईने पाहणी केली. बऱ्याच वेळ तपासणीनंतर चेंडूच्या स्थितीत कोणताही गंभीर बदल किंवा आक्षेपार्ह खुणा न आढळल्याने पंचांनी सामना पुढे सुरू ठेवण्याची परवानगी दिली. असे असली तरी सोशल मीडियावर क्रिकेट चाहत्यांनी मात्र त्याच्या खिलाडू वृत्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

## क्वालिफिकेशन टॅगपासून टॉपर गुजरात अद्याप दूर

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६ मध्ये आता प्ले ऑफची फेरी जवळ आली आहे. प्रत्येक संघाचे काहीच सामने बाकी आहेत, परंतु अजूनही अंतिम चार संघ कोणते हे काही निश्चित झाले नाही. मंगळवारी झालेल्या सनरायजर्स हैदराबाद आणि गुजरात टायटन्स यांच्यातील सामन्यामध्ये गुजरातने विजय मिळवत पॉइंट टेबलमध्ये १६ गुणांसह पहिले स्थान गाठले, मात्र तरीसुद्धा गुजरातचा संघ अद्याप क्वालिफाय झालेला नाही. याचे कारण पॉइंट टेबलमध्ये आता अंतिम चारसाठी सहा संघांत चुरस पहायला मिळणार आहे.

गुजरात अजूनही आयपीएलमधून बाहेर पडू शकते. इतर संघांचेही १६ गुण होऊ शकतात. नेट रनरेटच्या जोरावर ते गुजरातला बाजूला करू शकतात. आता दुसऱ्या नंबरवर आरसीबी, तिसऱ्या



स्थानी सनरायझर्स, चौथ्या स्थानी पंजाब किंग्स, पाचव्या स्थानी सीएसके, सहाव्या स्थानी राजस्थान व सातव्या स्थानी असलेले केकेआर सर्वांना अजूनही संधी आहे. हे सगळे संघ उर्वरित सामन्यात विजय मिळवत १६ गुण मिळवू शकतात. त्यामुळे अजूनही गुजरात टायटन्सला क्वालिफिकेशनचा टॅग मिळालेला नाही. दरम्यान, गुजरातचा पुढचा सामना १६ आणि २१ मे रोजी अनुक्रमे कोलकाता नाईट रायडर्स आणि चेन्नई सुपर किंग्स यांच्याशी होणार आहे. त्यामुळे दोन्ही सामने चुरशीचे पाहायला मिळतील, अशी अपेक्षा सर्व प्रेक्षकांना असणार आहे.

# ५० षटकांत तब्बल ८२२ धावा

## झिम्बाब्वेत देशांतर्गत क्रिकेटमध्ये चौकार, षटकारांची आतषबाजी

**हरारे : वृत्तसंस्था**

क्रिकेटमध्ये एकेकाळी ३०० धावा ही अवाढव्य धावसंख्या मानली जात होती. सध्याही वनडे सामन्यात ४०० पार ही धावसंख्या सामना जिंकवून देण्यासाठी पुरेशी मानली जाते, पण झिम्बाब्वेच्या देशांतर्गत क्रिकेटमध्ये जे घडले, ते वेगळेच होते. २०२५-२६च्या 'मास्विंगो ५० ओव्हर फर्स्ट लीग'मध्ये खेळल्या गेलेल्या एका सामन्यात स्कॉर्पियन्स क्रिकेट क्लबने ५० षटकांत ८२२ धावा केल्या. त्यानंतर मेथवेन लायन्सचा अवघ्या २८ धावांवर सफाया केला आणि सामना ७९४ धावांनी जिंकला.

स्कॉर्पियन्सचा कर्णधार प्रेझ माकाझाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि मग मैदानावर धावांचा पाऊस पडला. सलामीवीर विल्फ्रेड मार्टेंडे आणि ताकुंडा माडेम्बो यांनी अगदी सुरुवातीपासूनच




गोलंदाजांना लक्ष्य केले. त्यांचा पहिला बळी २१.३ षटकांत बाद झाला, तेव्हा मार्टेंडेने आपले द्विशतक पूर्ण केले होते. त्याने अवघ्या ७५ चेंडूंमध्ये २३ चौकार आणि १३ षटकारांसह २०३ धावा ठोकल्या.

दुसरीकडे मडेम्बोने एकट्यानेच त्रिशतकी मजल मारली. रिटायर्ड हर्ट होण्यापूर्वी त्याने १४३ चेंडूंमध्ये ३०२ धावा केल्या. त्याच्या या खेळीत ५० चौकार आणि सात षटकारांचा समावेश होता. त्यानंतर व्हिन्सेंट मोयोने ३९ चेंडूंमध्ये ७८ धावा ठोकल्या, तर गॅब्रिएल जयाने अवघ्या ४९ चेंडूंमध्ये नाबाद ११० धावा केल्या. गोलंदाजी संघाने एकूण १०८ अतिरिक्त धावा दिल्या. त्यामुळे संघाच्या ८२२ धावा झाल्या.

स्कॉर्पियन्सच्या गोलंदाजांच्या भेदक माऱ्यापुढे मेथवेन लायन्स संघ केवळ २८/७ (७.५ षटकांत) धावांपर्यंतच पोहचू शकला व सामना थांबवण्यात आला. मेथवेन लायन्स संघ ७९४ धावांनी हरला. क्रिकेटच्या इतिहासात इतक्या मोठ्या फरकाने झालेला पराभव क्वचितच पाहायला मिळाला.

# पंजाब संघाबद्दल चुकीची माहिती पसरवू नका -प्रिती झिंटा

**चंदिगड : वृत्तसंस्था**

पंजाब किंग्जची यंदाच्या आयपीएल २०२६मधील सुसाट सुटलेली गाडी शेवटच्या फेजमध्ये येऊन अडखळत असताना दिसत आहे. यामुळे प्ले ऑफ गाठण्याचे त्यांचे स्वप्न स्वप्नच राहते का, अशी स्थिती आता निर्माण झाली आहे. कधीकाळी अव्वल स्थानावर मानाने विराजमान असलेली पंजाब टीम ही आता एकदम चौथ्या स्थानावर फेकली गेली आहे.

पंजाबला राजस्थान रॉयल्सविरूद्धचे २२३ धावांचे टार्गेट डिफेंड करता आले नव्हते. त्यानंतर गुजरातविरूद्धचे १६३ धावांचे आव्हान पार करताना



पंजाबने मधेच गटांगळ्या खाल्या होत्या. हैदराबादविरूद्धदेखील पंजाबला ३३ धावा कमी पडल्या होत्या. त्यातच दिल्लीने धमरशालामध्ये पंजाबचे २१० धावांचे आव्हान पार करीत त्यांना सलग चौथ्या पराभवाचा जोरदार असा धक्का दिला होता.

या वाईट कामगिरीनंतर पंजाब संघावर सोशल मीडियावरून तुफान टीका केली जात आहे. संघात शिस्तीवरून काही समस्या आहेत असा दावा केला जात आहे. ही समस्या मैदानावर आणि मैदानाबाहेरही आहे, असादेखील दावा केला जात आहे.

या दाव्यानंतर पंजाब किंग्जची सहमालकीण प्रिती झिंटा संघासाठी धावून आली आहे. तिने चाहत्यांना, माध्यमांना चुकीची माहिती पसरवू नका असे सांगितले. काहीजण फ्रेंचायजीबाबत कॅल्क्युलेटेड मिसइन्फॉर्मेशन पसरवत आहेत, असादेखील आरोप तिने केला.

प्रिती झिंटाने ट्वीट केले की, टीका आणि मुद्दाम चुकीची माहिती पसरवणे यात फरक आहे. खेळाबाबतची हेल्दी चर्चेचे स्वागतच आहे. मात्र एखाद्या व्यक्तीला संघाला किंवा ब्रँडला हानी पोहचवण्यासाठी मुद्दाम काही फेक नॅरेटिव्ह पसरवणे हलक्यात घेतले जाणार नाही. मी अधिकृत माध्यमे आणि प्रतिनिधी सर्वांना विनंती करते की कोणतीही अनधिकृत माहिती पुढे देण्याआधी तुमची त्याची शहानिशा करण्याची जबाबदारी पार पाडा.

पंजाब किंग्जनेदेखील अशाच आशयाचे ट्वीट करीत लोकांना चुकीची माहिती पसरवण्यापूर्वी त्याची शहानिशा करण्याची विनंती केली आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com